१०४ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

NAVAKAL

• मुंबई, रविवार १९ एप्रिल, २०२६ • वर्ष-१०४, अंक-४५, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 104, Issue - 45 Marathi - Daily - Mumbai, 19 April, 2026 Page - 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे 24x7 : www.navakal.in Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

Mumbai High Court चा निकाल: "नजर अयोग्य, पण गुन्हा नाही?"

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

## थोडक्यात...

### भारतीय अर्थव्यवस्थेची घसरण पाचव्या स्थानावरून सहावे स्थान



**मुंबई -** २०२५ मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेची घसरण झाली असून पाचव्या स्थानावरुन सहाव्या स्थानावर गेली आहे. म्हणजे भारताची अर्थव्यवस्था आता जगातील सहाव्या क्रमांकाची मोठी अर्थव्यवस्था बनली आहे. मात्र दिलासादायक बाब म्हणजे जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून भारताचे नाव कायम आहे, आंतरराष्ट्रीय नाणे निधीने (आयएमएफ)जाहीर केलेल्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे.

२०२५ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था ३.९२ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचली.त्यामुळे ब्रिटन (४ ट्रिलियन डॉलर) आणि जपानच्या (४.४४ ट्रिलियन डॉलर) अर्थव्यवस्थांच्या तुलनेत भारत मागे पडला. आयएमएफच्या यादीत अमेरिका (३०.८ ट्रिलियन डॉलर) अव्वल स्थानी कायम आहे. दुसऱ्या स्थानी चीन (१९.६ ट्रिलियन डॉलर) तर तिसऱ्या स्थानी जर्मनी (४.७ ट्रिलियन डॉलर) आहे.

२०२४ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था (३.५ ट्रिलियन डॉलर) ब्रिटनच्या (३.४ ट्रिलियन डॉलर) पुढे पाचव्या स्थानी होती. डॉलर जास्तीत जास्त मजबूत होत गेल्याने डॉलरवर आधारित जीडीपीच्या निकषांवर भारतीय अर्थव्यवस्था वाढीचा वेग मंदावला. त्यामुळे भारताची एका स्थानाने घसरण झाली.




### केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ



**नवी दिल्ली -** केंद्रीय मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी मोठा निर्णय घेण्यात आला. कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात २ टक्के वाढ करण्याला बैठकीत मंजुरी देण्यात आली. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५८ टक्क्यांवरून ६० टक्क्यांवर पोहोचला.

केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांची

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

संख्या सध्या ५० लाख आहे. तर निवृत्तीवेतनधारकांची सध्या ६४ लाख आहे. या साऱ्यांना केंद्र सरकारच्या या निर्णयाचा लाभ होणार आहे. महागाई भत्त्यात वाढ करण्याच्या घोषणेला पहिल्यांदाच इतका उशीर झाला आहे. सर्वसामान्यपणे सरकारकडून जानेवारी ते जून या सहामाहीसाठी मार्च महिन्यात महागाई भत्ता वाढीची घोषणा केली जाते. यावर्षी दहा वर्षात पहिल्यांदाच सरकारने एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात घोषणा केली. महागाई भत्ता वाढीचा हा निर्णय जानेवारीपासून लागू असणार आहे.

# आम्ही महिलांचे आरक्षण अडविले असे खोटे सांगत फिरण्याचा भाजपाचा कट! प्रियंका गांधींचा हल्लाबोल

■ नवी दिल्ली

**महिला आरक्षण घटना दुरुस्ती विधेयक काल विरोधकांच्या एकीमुळे लोकसभेत नामंजूर झाले. आज काँग्रेस खासदार प्रियंका गांधी यांनी यावरून मोदी सरकारविरोधात निशाणा साधत आपली भूमिका मांडली. त्या म्हणाल्या की, काल लोकसभेत जे घडले तो लोकशाहीचा मोठा विजय आहे. महिला आरक्षणाचा मुद्दा पुढे करून मतदारसंघ पुनर्रचना करीत सत्तेत राहण्याचा कट सरकार रचत होते. तो आम्ही उधळून लावला. २०२३ मध्ये सर्वसंमतीने मंजूर झालेले ३३ टक्के महिला आरक्षण विधेयक तत्काळ अंमलात आणा, ही आमची मागणी आहे. आम्ही त्याला पाठिंबा देऊ.**



**प्रियंका** गांधी आज पत्रकार परिषदेत म्हणाल्या की, काल जे घडले तो संविधानाचा, देशाचा आणि विरोधकांच्या ऐक्याचा विजय आहे. सत्ताधाऱ्यांच्या चेहऱ्यावरच हे स्पष्ट दिसत होते. गृहमंत्री आणि पंतप्रधान यांनी आपल्या भाषणात म्हटले की तुम्ही आमच्याशी असहमत असाल तर तुम्ही इथे बसू शकत नाही. सत्तेत येऊ शकत नाही. जिंकू शकत नाही. हे धक्कादायक होते. २०११ च्या जनगणनेनुसार मतदारसंघ फेरफार केला तर जात जनगणना करावी लागणार नाही, असे त्यांना वाटत होते. त्यासाठी त्यांनी महिला आरक्षण मुद्दा त्याला जोडला. म्हणजे हे मंजूर झाले तर चांगले आणि मंजूर झाले नाही तर विरोधक महिला विरोधी आहेत, असे सांगत फिरायचे ही त्यांची योजना आहे.विरोधकांनी या विधेयकाला समर्थन देणे शक्यच नव्हते.

प्रियंका गांधी पुढे म्हणाल्या की, कालचा दिवस काळा होता, असे ते म्हणतात. हा दिवस त्यांच्यासाठी निश्चित काळा दिवस होता. कारण पहिल्यांदाच त्यांना धक्का बसला आहे. तो बसायलाच हवा आहे. महिला मुर्ख नाहीत. पीआर मीडियाबाजी सगळे बघत आहेत. काही ठोस करायचेच असेल तर जे २०२३ साली महिला आरक्षण विधेयक मंजूर झाले ते आता लगेच लागू करा. आम्ही सतत मागणी करणार आहोत की २०२३ साली मंजूर केलेले महिला आरक्षण विधेयक अंमलात आणा.

सध्या सरकार जे काही करते आहे, त्यावरून स्पष्ट दिसते आहे की, ते प्रचंड दबावाखाली आहेत. त्यामुळेच त्यांनी अमेरिकेशी तसा करार केला. कुणीही पंतप्रधान असा करार करणार » पान २ वर

## 'नारीशक्ती'च्या विरोधकांना त्यांच्या पापाची सजा मिळेल!



संसदेत काल नारीशक्ती विधेयक फेटाळण्यात आल्यानंतर आज पंतप्रधान मोदी यांनी देशाला संबोधित केले. विधेयकाला विरोध करणाऱ्या विरोधी पक्षांवर घणाघाती टीका करत ते म्हणाले की, हे विधेयक मंजूर न झाल्याबद्दल माता-भगिनींची क्षमा मागतो. काही लोकांसाठी पक्षहित देशहितापेक्षा महत्त्वाचे ठरले. काँग्रेस, द्रमुक, तृणमूल, समाजवादी पक्ष यांसारख्या पक्षांनी केलेल्या स्वार्थी राजकारणाची किंमत देशातील महिलांना मोजावी लागली. महिलांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी मांडलेल्या या विधेयकाचा पराभव होत होता, तेव्हा घराणेशाहीवर चालणारे हे पक्ष आनंदाने बाक वाजवत होते. हे बाक वाजवणे नव्हते, तर तो महिलांच्या सन्मानावर केलेला आघात होता. संसदेत काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांनी केलेल्या वर्तनाची सल महिलांच्या मनात कायम राहील. महिला आरक्षणाच्या मार्गात अडथळा निर्माण करून विरोधकांनी जे पाप केले आहे, त्याची शिक्षा त्यांना भोगावी लागेल. या पक्षांनी राज्यघटनेच्या निर्मात्यांच्या भावनांचा अपमान केला आहे. जनतेकडून दिली जाणारी शिक्षा » पान २ वर

## पार्थच्या खासदारकीनंतर लगेचच शीतल तेजवानीला जामीन मंजूर



**दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा पुत्र व राज्यसभेचे खासदार पार्थ पवार यांच्याशी संबंधित मुंढवा जमीन गैरव्यवहार प्रकरणात अटकेत असलेल्या शीतल तेजवानीला उच्च न्यायालयाने दोन गुन्ह्यात जामीन मंजूर केला आहे. राज्यसभेवर पार्थ पवार यांची नुकतीच खासदार म्हणून नियुक्ती झाल्यानंतर काहीच दिवसांत तेजवानीला जामीन मिळाल्याने चर्चांना उधाण आले आहे. हा केवळ कायदेशीर प्रक्रियेतील त्रुटींचा परिणाम होता की पोलिसांकडून जाणीवपूर्वक हलगर्जीपणा करण्यात आला, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.**

■ पुणे

**न्यायालयाने** या प्रकरणाच्या सुनावणीवेळी अटक व रिमांड प्रक्रियेतील गंभीर त्रुटींचा उल्लेख करत पोलिसांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. पुणे पोलिसांनी अटक करताना अटकेचे स्पष्ट कारण सांगितले नाही, पिंपरी येथील सेवा विकास बँक प्रकरणात अटकेपूर्वी दोन तास आधी सूचना देण्याचा नियम पाळला नाही या बाबींवर न्यायालयाने ताशेरे ओढले. परिणामी, अटक व त्यानंतरचे रिमांड आदेश बेकायदेशीर ठरवत न्यायालयाने तेजवानीला तत्काळ मुक्त करण्याचे आदेश दिले. न्यायालयाने दोन्ही गुन्ह्यांसाठी स्वतंत्र ५० हजार रुपयांचा जातमुचलका व तितक्याच रकमेचा जामीनदार देण्याची अट घातली आहे. याशिवाय, पुराव्याशी छेडछाड न करणे, साक्षीदारांना धमकी किंवा प्रलोभन न देणे, तपास » पान २ वर

## एपस्टिनच्या गायब झालेल्या १६ फाइल! राहुल गांधींचे कोडे

**नवी दिल्ली -** संसदेत काल बोलताना विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी म्हटले की, १६ एप्रिल या दिवशी निवेदन करताना पंतप्रधान मोदी निरुत्साही वाटत होते. १६ हा क्रमांक महत्त्वाचा आहे. राहुल गांधी यांच्या या १६ क्रमांकाच्या वक्तव्याने या क्रमांकाबाबत सर्वांची उत्सुकता वाढवली. याबद्दल देशभरात चर्चा सुरू आहे की, १६ नंबर हा जेफ्री एपस्टिन प्रकरणाशी संबंधित आहे.

अमेरिकेच्या न्याय विभागाच्या वेबसाइटवरून एपस्टिन प्रकरणाच्या १६ फाइल अपलोड केल्यानंतर २४ तासांच्या आत गायब करण्यात आल्या. या हटवलेल्या फाइलमध्ये कथितपणे चित्रकला, नावे व अपार्टमेंट क्रमांक असलेल्या वहीच्या पानाचा फोटो, डोनाल्ड ट्रम्प, एपस्टीन, मेलानिया ट्रम्प आणि घिसलेन मॅक्सवेल यांचा एकत्र फोटो यांचा समावेश आहे, अशी चर्चा आहे. अमेरिकन न्याय विभागाने सांगितले की नवीन माहिती समोर येत असल्यामुळे पीडितांच्या गोपनियतेचे रक्षण करण्यासाठी अतिरिक्त सावधगिरी म्हणून या फाइलींचे पुनरावलोकन व संपादन केले जात आहे.

## खरातचा निकटवर्ती शेळकेंच्या अपघातावर संशय! कंटेनर चालकाची चौकशी

■ नाशिक

**नाशिकमधील** भोंदूबाबा अशोक खरातचे निकटवर्ती आणि शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष जितेंद्र शेळके यांचा काल समृद्धी महामार्गावर भीषण अपघातात मृत्यू झाला. या अपघाताबाबत संशय व्यक्त होत असून गुप्त माहिती बाहेर येऊ नये म्हणून हा अपघात घडवल्याचे बोलले जात आहे.

शेळके यांची कार ज्या कंटेनरला धडकली तो कंटेनर उत्तर प्रदेशच्या अमेठी येथील जमाल वारिस हा चालवत होता. पोलिसांनी जमाल याची कसून चौकशी केली. जमालने पोलिसांना दिलेल्या प्राथमिक जबाबामध्ये म्हटले की, मी हैदराबादवरुन अहमदाबादकडे जात असताना काल दुपारी १२ वाजता कंटेनरच्या रेडिएटरचा पाईप लीक झाल्याने गाडी गरम झाली होती. त्यामुळे मी कंटेनर रस्त्याच्या बाजूने हळू वेगात घेऊन चाललो होतो. मी कंटेनर थांबवला नव्हता, फक्त वेग कमी होता. त्यावेळी मागून



कार येऊन माझ्या कंटेनरला धडकली. मला मागून जोरात आवाज आला. पण मला आरशात काही दिसले नाही. मी खाली उतरुन बघितले तेव्हा कार ठोकलेली दिसली.

हा अपघात नसून घातपात असल्याची शंका अनेकांनी व्यक्त केली आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे की, शिवनिका संस्थानचे उपाध्यक्ष आणि भोंदू अशोक खरात याचे सहकारी जितेंद्र » पान २ वर

## राहुल गांधींवरील एफआयआर कोर्टाची आदेशाला स्थगिती

■ अलाहाबाद

**अलाहाबाद** उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाने खासदार राहुल गांधींविरोधात एफआयआर नोंदवण्याच्या काल दिलेल्या स्वतःच्याच आदेशाला स्थगिती दिली. हे प्रकरण राहुल गांधी यांच्या दुहेरी नागरिकत्वाशी संबंधित आहे.

न्यायालयाने म्हटले की, काल झालेल्या सुनावणीमध्ये राहुल गांधींना नोटीस बजावण्याची गरज आहे का, असे याचिकाकर्त्यासह केंद्र आणि राज्य सरकारच्या वकिलांना विचारण्यात आले होते. वकिलांनी नोटीस बजावण्याची कोणतीही गरज नसल्याचे सांगितले होते. त्यानंतर एफआयआर नोंदवण्याचा आदेश पारित करण्यात आला होता.

मात्र, आदेश टाइप होण्यापूर्वी न्या. सुभाष विद्यार्थी यांनी पुन्हा निर्णयाची तपासणी केली. अलाहाबाद उच्च न्यायालयाने २०१४ मध्ये अशा प्रकरणांमध्ये प्रस्तावित आरोपीला नोटीस पाठवणे आवश्यक असते, असे एका निर्णयात म्हटले होते.

## भोंदू अशोक खरातला चौथ्या गुन्ह्यात न्यायालयीन कोठडी



■ नाशिक

**भोंदू** अशोक खरात याला महिला अत्याचार प्रकरणातील चौथ्या गुन्ह्यातील पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर आज नाशिक जिल्हा न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. तसेच, उद्या पाचव्या गुन्ह्याच्या संदर्भात त्याला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.

यापूर्वी न्यायालयाने खरातला १७ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी दिली होती. ती मुदत संपल्यानंतर आज त्याला पुन्हा न्यायालयासमोर हजर करण्यात आले. सुरक्षेच्या कारणास्तव यावेळीही त्याला प्रत्यक्ष न्यायालयात न आणता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारेच हजर करण्यात आले. सुनावणीदरम्यान न्यायालयाने त्याची ओळख पटवण्यासाठी थेट त्याचे नाव विचारले आणि त्यानंतर दुसऱ्या गुन्ह्यात न्यायालयीन कोठडी देण्याचा निर्णय घेतला. उद्या पुन्हा खरातला पाचव्या गुन्ह्याअंतर्गत न्यायालयात हजर केले जाईल. यावेळी विशेष तपास पथक त्याला आपल्या ताब्यात घेण्यासाठी पुन्हा पोलीस कोठडीची मागणी करणार आहे.

दरम्यान, ईडीने खरातच्या 'ओकस प्रॉपर्टी डीलर्स अँड डेव्हलपर्स' या कार्यालयाची आज पुन्हा तपासणी केली. कालदेखील या कार्यालयावर छापा टाकून सुमारे साडेतीन तास तपासणी करण्यात आली होती.

## राज्यात आज-उद्या पावसाची शक्यता

■ पुणे

**राज्यात** काही दिवसांपासून उष्णतेचा सामना करणाऱ्या नागरिकांना आता काहीसा दिलासा मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. उद्या १९ आणि २० एप्रिलदरम्यान पुण्यासह विविध भागांत मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि ताशी ३० ते ४० किमी वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. एप्रिलच्या सुरुवातीला काही भागांत गारपीट झाल्यानंतर तापमानात सातत्याने वाढ होत होती. विदर्भ आणि मराठवाड्यात उष्णतेची लाट जाणवत असून पुणे परिसरातही उकाड्याची तीव्रता वाढली होती. या पार्श्वभूमीवर हवामानात होत असलेला बदल महत्त्वाचा मानला जात आहे.

## होर्मुज सामुद्रधुनी इराणकडून पुन्हा बंद दोन भारतीय जहाजांवर गोळीबार

■ तेहरान

**इस्त्रायल** आणि लेबनॉन यांच्यात दहा दिवसांचा युद्धविराम झाल्याने होर्मुजची सामुद्रधुनी सर्व देशांसाठी खुली करण्याचा निर्णय काल इराणने घेतला होता. परंतु आज आपला हा निर्णय फिरवत इराणने पुन्हा एकदा होर्मुजच्या सामुद्रधुनीवर निर्बंध लादले. अमेरिकेने शस्त्रसंधीचे उल्लंघन केल्याचा आरोप इराणने केला आहे. इराणच्या घोषणेनंतर होर्मुजमधून प्रवास करत असलेल्या जग अर्णव आणि सन्मार या दोन जहाजांवर इराणच्या रिव्हॉल्युशनेरी गार्डसने गोळीबार केला.

ही दोन्ही जहाजे भारतीय होती. जग अर्णव हे जहाज २० लाख बॅरल तेल घेऊन इराकहून निघाले होते. गोळीबारानंतर दोन्ही जहाजे माघारी फिरली. कुठलाही इशारा न देता हा गोळीबार करण्यात आला. या घटनेनंतर भारताने आक्रमक पवित्रा घेत इराणच्या भारतातील राजदूताला पाचारण करून कडक शब्दांत निषेध नोंदविला.

इराणच्या संयुक्त लष्करी कमांडने जाहीर केले की, सशस्त्र दलांच्या कडक व्यवस्थापन आणि नियंत्रणाखाली होर्मुज सामुद्रधुनीवरील नियंत्रण पूर्वस्थितीत परत आले.

इराणी संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाकर गालिबाफ यांनी ट्रम्प यांच्यावर १ तासात ७ खोटे दावे केल्याचा आरोप केला आहे. मात्र, ते » पान ५ वर

## मेटा कंपनी २० मे रोजी ८ हजार कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढणार

**फेसबुक आणि इन्स्टाग्राम याची मूळ कंपनी मेटा प्लॅटफॉर्म्स पुढील महिन्यात २० मे रोजी जगभरातून १० टक्के म्हणजे ८ हजार कर्मचाऱ्यांना कामावरून काढणार आहे. कंपनी २० मे रोजी या वर्षातील पहिल्या टप्प्यातील कर्मचारी कपात सुरू करणार असून, यानंतर आणखी टप्प्यांमध्ये कपात होणार असल्याची माहिती आहे.**

■ वॉशिंग्टन

**मेटाने** या पुढील कपातींचा कालावधी आणि प्रमाण अद्याप निश्चित झालेले नाही. मेटा आपल्या एकूण कर्मचारीवर्गाच्या २० टक्के किंवा त्याहून अधिक कर्मचाऱ्यांना कमी करण्याचा विचार करत होती. मात्र, कंपनीने या कपातीबाबत अधिकृत प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे. मेटाचे सीईओ मार्क झुकेरबर्ग एआय म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत असून कंपनीची रचना एआय केंद्रित करण्याचा प्रयत्न करत आहेत. हे यावर्षी अमेरिकेतील अनेक मोठ्या तंत्रज्ञान कंपन्यांमध्ये दिसणाऱ्या व्यापक ट्रेंडचा भाग आहे.




ॲमेझॉनने अलीकडच्या महिन्यांत सुमारे ३० हजार कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांना कमी केले आहे. तर ब्लॉक इंकने फेब्रुवारीमध्ये जवळपास निम्म्या कर्मचाऱ्यांना कमी केले. या दोन्ही कंपन्यांनी एआयमुळे कार्यक्षमता वाढल्याचे कारण दिले आहे. यावर्षात आतापर्यंत ७३,२१२ तंत्रज्ञान क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी नोकऱ्या गमावल्या आहेत.

## जेएनपीटीनजिक जेडब्ल्यूआर केमिकल गोदामाला आग

**उरण-** पनवेल तालुक्यातील गव्हाण फाटा येथे असलेल्या जेडब्ल्यूआर गोदामाला दुपारी सुमारे २ वाजताच्या सुमारास भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. आगीने काही क्षणांतच विक्राळ रुप धारण केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, सतत होणाऱ्या स्फोटांच्या आवाजामुळे नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे. प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, आगीचा भडका उडताच गोदामातील कामगार जीव वाचवण्यासाठी सैरावैरा पळू लागले. काही क्षणांतच संपूर्ण परिसर धुराच्या लोटांनी व्यापला गेला. या स्फोटांचे आवाज दूरवर उरण आणि पनवेल परिसरातही ऐकू आल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली.

## मराठा समाज मागासलेला राज्य सरकारचा कोर्टात दावा

■ मुंबई

**मराठा** समाजात आजही मागासलेपणा कायम आहे. या समाजाकडे तुच्छतेने पाहिले जाते त्यामुळे मराठा समाजाला आरक्षण देणे गरजेचे असल्याचा दावा सरकारच्या वतीने ॲडव्होकेट जनरल मिलिंद साठे यांनी आज हायकोर्टात करताना मराठा समाज पुढारलेला असल्याचा याचिकाकर्त्यांचा दाव्याचा चांगलाच समाचार घेतला. या प्रकरणाची सुनावणी आज अपूर्ण राहिल्याने पूर्णपीठाने सुनावणी ३० एप्रिलला निश्चित केली.

मराठा समाजाला नोकरी व शिक्षणामध्ये सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्गातून (एसईबीसी) १० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय तत्कालीन शिंदे सरकारने घेत तसा कायदा केला. तथापि, राज्यातील संपूर्ण आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडल्यामुळे मराठा आरक्षण कायद्याच्या कचाट्यात अडकले आहे. आरक्षणाला विरोध करणाऱ्या याचिकांसह तब्बल १८ याचिका दाखल झाल्या आहेत. हे आरक्षण घटनाबाह्य असल्याचा दावा याचिकांमधून करण्यात आला आहे. त्या सर्व याचिकांवर न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती संदिप मारणे आणि न्यायमूर्ती निझामुद्दीन जमादार यांच्या पूर्णपीठासमोर » पान २ वर

> शांतता आणि आर्थिक विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आर्थिक विकासाचा आलेख उंचावण्यासाठी सामाजिक शांतता ही पूर्वअट आहे. शांततापूर्ण वातावरण असेल तरच गुंतवणुकीचा प्रवाह अखंडित सुरू राहतो. अशा वातावरणात उद्योजक नवीन धाडस करण्यास उत्सुक असतात आणि श्रमिकांना आपल्या कौशल्याचा पूर्ण वापर करण्याची संधी मिळते, ज्यामुळे उत्पादकता वाढून राष्ट्राच्या सकल उत्पादनात (जीडीपी) भर पडते. याउलट सामाजिक अशांतता किंवा युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा सर्वात पहिला आणि मोठा फटका गुंतवणूकीला बसतो. भांडवल हे अत्यंत संवेदनशील असते; जिथे जोखीम जास्त असते, तिथून ते वेगाने बाहेर पडते. शांतता धोक्यात येते, तेव्हा सरकारांना आपला मोठा निधी शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांऐवजी संरक्षण आणि लष्करी सज्जतेवर खर्च करावा लागतो. हा अनुत्पादक खर्च भविष्यातील विकासाच्या संधी हिरावून घेतो. आज पूर्वेमध्येतील युद्धामुळे निर्माण झालेल्या अस्थिर आणि अशांत वातावरणाने याची प्रचिती प्रकर्षाने येत आहे.



# 'आयएमएफ'च्या इशाऱ्याचा अन्वयार्थ



**- अभय कुलकर्णी,**
मस्कत

**>>> रविवार विशेष**

रशिया-युक्रेन संघर्षाच्या जखमा अजून ओल्या असतानाच, फेब्रुवारी २०२६ पासून मध्यपूर्वेत भडकलेल्या अमेरिका-इराण युद्धामुळे जागतिक अर्थव्यवस्थेचे गणित पुन्हा एकदा कोलमडण्याच्या उंबरठ्यावर आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आपल्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक आऊटलुक' अहवालात २०२६ या वर्षासाठी अत्यंत नकारात्मक चित्र रेखाटले आहे. या अहवालातील आकडेवारी आणि सद्यस्थितीचे विश्लेषण केले असता, जगाला एका मोठ्या आर्थिक मंदीला सामोरे जावे लागण्याची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत. नाणेनिधीने या जागतिक आर्थिक अहवालात भू-राजकीय तणावामुळे निर्माण झालेल्या आर्थिक अस्थिरतेवर तीव्र चिंता व्यक्त केली आहे. जागतिक स्तरावर सातत्याने बदलणाऱ्या या घडामोडींचा थेट परिणाम आर्थिक विकासाच्या गतीवर होताना दिसत असून, आगामी काळात अनिश्चिततेचे ढग अधिक गडद होण्याची चिन्हे आहेत.

या अंदाजानुसार, २०२६ मध्ये जागतिक अर्थव्यवस्थेचा विस्तार ३.१ टक्क्यांपर्यंत मर्यादित राहण्याची शक्यता आहे. २०२५ मधील ३.४ टक्क्यांच्या विकासदराच्या तुलनेत ही घसरण लक्षणीय मानली जात असून, वाढती महागाई आणि युद्धजन्य परिस्थिती याला प्रामुख्याने कारणीभूत ठरत आहे. इतकेच नव्हे तर परिस्थिती बिघडल्यास आणि इंधनाच्या किमती वाढल्यास, २०२६ चा जागतिक विकासदर २.५ टक्क्यांपर्यंत खाली येऊ शकतो असे हा अहवाल सांगतो. विशेषतः सध्या ऊर्जा सुरक्षेचा प्रश्न जागतिक स्तरावर गंभीर बनला आहे. या अहवालात २०२६ मध्ये जागतिक सरासरी महागाई दर ४.४ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अत्यंत गंभीर परिस्थितीत, म्हणजे ऊर्जा संरचनेचे मोठे नुकसान झाल्यास २०२७ पर्यंत महागाई ६ टक्क्यांचा टप्पा ओलांडू शकते, असे हा अहवाल सांगतो.

जागतिक अर्थव्यवस्थेला गेल्या सहा वर्षांच्या कालखंडामध्ये दोन मोठ्या धक्क्यांचा सामना करावा लागला. २०२० मध्ये उद्भवलेल्या कोरोना महामारीने जागतिक अर्थव्यवस्थेला आधुनिक इतिहासातील सर्वात मोठ्या संकटात ढकलले होते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँकेच्या अधिकृत आकडेवारीनुसार, त्यावेळी जागतिक विकासदराचा (जीडीपी) प्रवास शून्याखाली जाऊन तो उणे ३.१ टक्क्यांवर स्थिरावला होता. १९३० च्या जागतिक महामंदीनंतरची ही सर्वात मोठी आर्थिक घसरण मानली जाते. २०१९ मध्ये जगाचा विकासदर २.८ टक्के होता. याचा अर्थ जागतिक अर्थव्यवस्थेच्या एकूण उत्पादनात सुमारे ६ टक्क्यांहून अधिक मोठी घट एका वर्षात नोंदवली गेली. २०२१ मध्ये जागतिक अर्थव्यवस्थेने वेगाने मुसंडी मारली. पण तोवरच रशिया-युक्रेन युद्धाचा भडका उडाला. त्याचा फटका वर्तवण्यात आलेल्या भीतीइतका बसला नसला तरी युरोपियन देशांना याची झळ अधिक बसली होती. कोरोना काळात मागणी घटल्याने किमती कमी झाल्या होत्या, परंतु सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीत मागणी स्थिर असतानाही पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे किमती गगनाला भिडल्या आहेत. विशेषतः इंधन आणि अन्नधान्याच्या किमतीतील वाढ ही कोणत्याही एका देशापुरती मर्यादित नसून ती सार्वत्रिक आहे.

या युद्धाचा सर्वात मोठा तडाखा जागतिक खत पुरवठा साखळीला बसला आहे. स्ट्रेट ऑफ होर्मुज हा सागरी मार्ग बंद झाल्यामुळे जगातील खतांच्या एकूण व्यापारापैकी सुमारे ३० टक्के पुरवठा ठप्प झाला आहे. नायट्रोजनयुक्त खतांच्या निर्मितीसाठी नैसर्गिक वायू हा मुख्य कच्चा माल असतो. इंधनाचे दर गगनाला भिडल्याने युरिया आणि इतर खतांच्या किमतीत केवळ एका महिन्यात २० ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. सागरी मार्गावरील लष्करी कारवाया आणि धोक्यांमुळे जहाजांच्या विम्याच्या हप्त्यांमध्ये दहापटीने वाढ झाली आहे. युद्धापूर्वी ज्या जहाजासाठी साधारणतः ४८ हजार डॉलर्स विमा भरावा लागत असे, तो आता १२ लाख डॉलर्सवर पोहोचला आहे. यामुळे रसद पुरवठा वाढला असून, आयात केल्या जाणाऱ्या अन्नधान्याच्या किमती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहेत. आफ्रिका आणि आशियातील अनेक देश, जे अन्नासाठी आयातीवर अवलंबून आहेत, त्यांना या वाढीव खर्चाचा मोठा फटका बसत आहे हा संघर्ष मे २०२६ च्या पुढे खेचला गेला, तर जगातील अतिरिक्त ४.५ कोटी लोक अन्नाच्या तीव्र टंचाईला बळी पडू शकतात अशी भीती व्यक्त होत आहे. अन्नाच्या वाढत्या किमती केवळ भूकच वाढवत नाहीत, तर त्या राजकीय आणि सामाजिक असंतोषालाही निमंत्रण देतात.

आयएमएफच्या चर्चेमध्ये प्रामुख्याने अनेक गरीब आणि विकसनशील देशांबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. याचे कारण या देशांवरील कर्जाचा बोजा विक्रमी पातळीवर पोहोचला आहे. २०२५ मध्ये या देशांना कर्जफेडीसाठी कोरोनापूर्व काळाच्या तुलनेत दुप्पट रक्कम मोजावी लागली आहे. यामुळे शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक योजनांवरील खर्चात कपात झाली असून, निम्म्याहून अधिक देश कर्जबाजारीपणाच्या उंबरठ्यावर आहेत.

भारताच्या बाबतीत मात्र चालू वर्षातील आर्थिक वाढीचा अंदाज थोडासा सुधारण्यात आला आहे. जानेवारीत केलेल्या अंदाजाच्या तुलनेत भारताच्या आर्थिक वाढीचा अंदाज ०.१ टक्क्यांनी वाढवून ६.५ टक्के करण्यात आला आहे. मागील वर्षातील मजबूत आर्थिक प्रगती आणि अमेरिकेकडून भारतीय वस्तूंवरील शुल्कात झालेली घट याचा विचार करून हा सुधारित अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. अलीकडेच देशातील महागाईची आकडेवारी जाहीर झाली असून मार्च महिन्यातील किरकोळ महागाई दर ३.४ टक्के इतका नोंदवला गेला आहे. फेब्रुवारीमध्ये ते ३.२ टक्के होता. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमती सामान्यतः आर्थिक वाढ कमी करतात आणि महागाई वाढवतात. त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किमतींमध्ये बदल झाल्यास ही परिस्थिती लवकरच बदलू शकते. सध्याचा धक्का कायम राहिला तर उंचावलेल्या तेल किमतींचा परिणाम अपेक्षेपेक्षा अधिक तीव्र होऊ शकतो. उदाहरणार्थ, नैसर्गिक वायूच्या उपलब्धतेतील अडचणी काही उद्योगांच्या उत्पादनावर परिणाम करत आहेत आणि त्याचा परिणाम शेवटी वस्तूंच्या किमतींमध्ये दिसून येऊ शकतो.

भारतासाठी चिंतेची बाब म्हणजे यंदा मान्सून सामान्यपेक्षा कमी राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. हवामान विभागाने यावर्षीचा मान्सून दीर्घकालीन सरासरीच्या सुमारे ९२ टक्के राहू शकतो असे म्हटले आहे. त्यामुळे कृषी उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता आहे आणि त्यातून अन्नधान्य महागाई वाढू शकते. या पार्श्वभूमीवर भारतीय धोरणकर्त्यांनी अधिक सावध राहणे आवश्यक आहे. अमेरिकन फेडरल रिझर्व्ह आणि भारतीय रिझर्व्ह बँक या केंद्रीय मध्यवर्ती बँकांनी व्याजदर जैसे थे ठेवून महागाई नियंत्रणाला प्राधान्य दिले आहे. आता नियोजनकर्त्यांनी नाणेनिधीच्या अहवालाचे सार लक्षात घेऊन उपाययोजना करणे गरजेचे आहे.

> जिज्ञासा हा मानवी उत्क्रांतीच्या प्रवासातील प्रगतीचा केंद्रीभूत घटक राहिला आहे. आकाशात दिसणाऱ्या तारेतारखा, चंद्र यांविषयीचे कुतुहल मानवाला अनादी काळापासून आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या मदतीने आज हे कुतुहल शमवण्याचे अनेक प्रयत्न झाले असले तरी विश्वाचा, ब्रह्मांडाचा पसारा इतका दिव्य आहे की, मिळालेली माहिती त्यापुढे एखाद्या धुळीकणाहून सूक्ष्म ठरावी. सुमारे साडेपाच दशकांपूर्वी जेव्हा नील आर्मस्ट्राँग यांनी चंद्रावर पाऊल ठेवले. मानवजातीने विज्ञानाच्या जोरावर मिळवलेला तो परमोच्च विजय होता. अपोलो मोहिमांच्या प्रदीर्घ विश्रांतीनंतर 'आर्टेमिस' प्रकल्पाच्या माध्यमातून मानवाने पुन्हा चंद्रलोकाकडे झेप घेतली आहे. १ एप्रिल २०२६ रोजी अमेरिकेतील फ्लोरिडा येथील जॉन एफ. केनेडी स्पेस सेंटरवरून 'आर्टेमिस २' या ऐतिहासिक मोहिमेचे यशस्वी प्रक्षेपण झाले आणि १० दिवसांचा चित्तथरारक प्रवास पूर्ण करून ११ एप्रिल रोजी हे यान पॅसिफिक महासागरात सुखरूप परतले. या मोहिमेतून हाती आलेल्या विदा (डेटा) आणि वैज्ञानिक यशाचे विश्लेषण करणे अंतराळ संशोधनाच्या दृष्टीने अत्यंत निर्णायक ठरते.



# 'आर्टेमिस २' च्या यशाचा अन्वयार्थ



**श्रीनिवास औंधकर,**
खगोलशास्त्र अभ्यासक

आर्टेमिस २ ही अंतराळ संशोधनाचा पाय समृद्ध करणारी मोहीम ठरली. १९७२ मधील अपोलो १७ मोहीमेनंतर मानवाचे चंद्रावर जाणे थांबले होते. त्यानंतर अनेक दशके मानवी मोहिमा केवळ पृथ्वीच्या खालच्या कक्षेपुरत्याच (लो अर्थ ऑर्बिट) मर्यादित होत्या. मात्र, आर्टेमिस १ च्या मानवरहित यशानंतर नासाने आर्टेमिस २ द्वारे चार अंतराळवीरांना चंद्राच्या कक्षेत धाडून एक नवीन अध्याय यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. या मोहिमेचे सर्वात महत्त्वाचे अंग म्हणजे 'स्पेस लॉन्च सिस्टिम' (एसएलएस) हा महाकाय रॉकेट. हे जगातील आजवरचे सर्वात शक्तिशाली रॉकेट ठरले आहे. प्रक्षेपणाच्या वेळी या रॉकेटने सुमारे २७ लाख किलोग्राम इतका प्रचंड यांत्रिक बल (थ्रस्ट) निर्माण केला होता. या बलामुळे ओरियन अंतराळ यान पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण कक्षेबाहेर ढकलून चंद्राच्या दिशेने वेगाने झेपावू शकले.

या मोहिमेत वापरण्यात आलेले 'ओरियन' अंतराळ यान हे आधुनिक अभियांत्रिकीचा एक अद्भुत नमुना ठरले आहे. चंद्राचा प्रवास करताना अंतराळवीरांना ज्या आव्हानांचा सामना करावा लागला, त्यामध्ये प्राणवायूचा पुरवठा, पाण्याचे व्यवस्थापन आणि तापमानातील टोकाचे बदल यांचा समावेश होता. ओरियनमधील 'ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट सिस्टिम'ने या सर्व घटकांचे अत्यंत सूक्ष्मपणे नियंत्रण केले. विशेष म्हणजे, या यानाने ताशी ४०,००० किलोमीटर वेगाने प्रवास करून अंतराळ विज्ञानातील 'ट्रान्स-ल्युनार इंजेक्शन' आणि 'फ्री रिटर्न ट्रॅजेक्टरी' या तत्त्वांची अचूकता सिद्ध केली. या प्रवासात अंतराळवीरांनी पृथ्वीपासून सुमारे ४,००,००० किलोमीटरपेक्षा जास्त अंतर कापले असून, १९७० मधील अपोलो-१३ मोहिमेचा सर्वाधिक अंतराचा विक्रम आता इतिहासजमा झाला आहे.

वैज्ञानिक दृष्टिकोनातून या मोहिमेचा मुख्य उद्देश खोल अंतराळातील रेडिएशनचा (किरणोत्सर्ग) मानवी शरीरावर होणारा परिणाम तपासणे हा होता. पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राबाहेर गेल्यानंतर अंतराळवीरांना सौर ज्वाला आणि वैश्विक किरणांचा सामना करावा लागला. ओरियनमधील विशेष संरक्षक कवच या किरणोत्सर्गापासून बचाव करण्यास किती सक्षम ठरले, याचे यशस्वी मूल्यमापन या प्रवासात करण्यात आले. या माहितीचा उपयोग आगामी आर्टेमिस-३ मोहिमेसाठी केला जाणार आहे, ज्यामध्ये पहिल्यांदाच मानवाचे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर पाऊल पडणार आहे. चंद्राचा हा दक्षिण ध्रुव अत्यंत महत्त्वपूर्ण आहे, कारण येथे गोठलेल्या स्वरूपात पाणी असण्याची दाट शक्यता असून, त्याचे विघटन करून भविष्यात चंद्रावरच रॉकेट इंधन तयार करण्याचे उद्दिष्ट आहे.

आर्टेमिस-२ च्या यशाचा थेट संबंध मानवाच्या मंगळ मोहिमेशी जोडलेला आहे. चंद्र हा मंगळाकडे जाण्यासाठीचा एक तळ म्हणून वापरला जाणार आहे. चंद्राच्या कक्षेत ल्युनार गेटवे नावाचे एक कायमस्वरूपी स्थानक उभारण्याच्या योजनेला या मोहिमेच्या यशामुळे मोठी गती मिळाली आहे. या प्रवासादरम्यान गोळा करण्यात आलेली आकडेवारी मानवी शरीर दीर्घकाळ अंतराळात राहण्यासाठी किती सज्ज आहे, हे स्पष्ट करेल. या प्रक्रियेत विकसित झालेली तंत्रज्ञाने केवळ अंतराळ संशोधनासाठीच नाही, तर पृथ्वीवरील मानवी जीवनासाठीही क्रांतिकारी ठरणार आहेत. यामध्ये प्रगत सौर ऊर्जा उपकरणे आणि पाण्याचे शुद्धीकरण करणाऱ्या यंत्रणांचा समावेश असून त्याचा फायदा भविष्यात पृथ्वीवरील दुर्गम भागांना होऊ शकतो.

या जागतिक महामंथनात भारताची भूमिका अत्यंत महत्त्वाची आणि विश्वासाची ठरली आहे. भारताच्या इस्रोने चांद्रयान-३ मोहिमेद्वारे चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी लँडिंग करून जगाला आपली ताकद आधीच दाखवून दिली आहे. यामुळेच आर्टेमिस करारामध्ये भारताचा सहभाग हा जागतिक अंतराळ संशोधनाला एक नवी दिशा देणारा ठरला आहे. भारताची स्वदेशी मानवी अंतराळ मोहीम 'गगनयान' आता अंतिम टप्प्यावर असून, आर्टेमिस-२ कडून मिळालेले तांत्रिक धडे भारतीय शास्त्रज्ञांसाठी मोलाचे ठरणार आहेत. कमी खर्चात अचूक मोहीम राबवण्याचे भारताचे कौशल्य आणि नासाचे प्रगत तंत्रज्ञान यांचा संगम भविष्यात मानवाला मंगळापर्यंत नेण्यासाठी मैलाचा दगड ठरेल.

ही मोहीम यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर शास्त्रज्ञांचे लक्ष ओरियन यानाच्या 'री-एन्ट्री' दरम्यान गोळा झालेल्या माहितीवर केंद्रित आहे. पृथ्वीच्या वातावरणात शिरताना घर्षणामुळे निर्माण झालेल्या २८०० अंश सेल्सिअस तापमानाला यानाच्या 'हीट शील्ड'ने ज्या प्रकारे थोपवले, ते विज्ञानाचे मोठे यश आहे. पॅसिफिक महासागरात यान उतरल्यानंतर मानवी इतिहासातील एका सुवर्णकाळाची ही खऱ्या अर्थाने सुरुवात झाली आहे. ही मोहीम केवळ पृथ्वीवरील आठ अब्ज लोकांच्या महत्त्वाकांक्षेचे प्रतिबिंब होती. आपण आता केवळ पृथ्वीचे रहिवासी उरलो नसून, विश्वयात्री बनण्याच्या दिशेने खंबीर पाऊल टाकले आहे. हे यश विज्ञानाचे सामर्थ्य आणि मानवाच्या अनंत जिज्ञासेचे प्रतीक आहे. या यशामुळे 'लूनर इकॉनॉमी' म्हणजेच चांद्र अर्थव्यवस्थेच्या पायाभरणीला सुरुवात होईल. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर असलेल्या पाण्याचा वापर करून हायड्रोजन इंधन निर्मिती करण्याचे तंत्र विकसित झाल्यामुळे भविष्यातील मोहिमांचा खर्च प्रचंड प्रमाणात कमी होणार आहे. यामुळे खाजगी क्षेत्रातील कंपन्यांना अंतराळात खाणकाम (स्पेस मायनिंग), पर्यटन आणि संशोधन या क्षेत्रांत मोठ्या गुंतवणुकीसाठी प्रोत्साहन मिळेल. चंद्रावर मानवी वसाहती स्थापन करण्याच्या प्रक्रियेला यामुळे वेग येईल, ज्यामुळे पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधनांवरील ताण कमी होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे मानवाला 'मल्टी-प्लॅनेटरी' (अनेक ग्रहांवर वास्तव्य करणारी प्रजाती) बनवण्याच्या दिशेने पडलेले हे एक क्रांतिकारी पाऊल आहे. विज्ञानाच्या या प्रगतीमुळे पृथ्वीच्या सीमा ओलांडून विश्वातील नवीन रहस्यांचा उलगडा करणे आता अधिक सुलभ आणि सुरक्षित होणार आहे.

> जागतिक भू-राजकीय अस्थिरता आणि आर्थिक अनिश्चिततेच्या काळात सोन्याच्या भावात किती आणि कशी वाढ होते, याचा प्रत्यय आपण गेल्या काही महिन्यांपासून घेत आहोत. त्याच वेळी सोन्याबाबत आणखी एक प्रवाह जागतिक प्रवाह अलीकडील काळात रुढ होत चालल्याचे दिसून येत आहे. हा प्रवाह म्हणजे राष्ट्रे आपल्या सुरक्षिततेसाठी सोन्यासारख्या खात्रीशीर मालमत्तेकडे पुन्हा वळू लागली आहेत. याचे ताजे उदाहरण काही दिवसांपूर्वी बँक ऑफ फ्रान्सने अमेरिकेच्या न्यूयॉर्कमधील फेडरल रिझर्व्ह बँकेत ठेवलेला आपला सोन्याचा संपूर्ण साठा मायदेशी परत नेण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. हा जागतिक अर्थव्यवस्थेत अमेरिकन डॉलरच्या वर्चस्वाला बसू लागलेल्या धक्क्यांचे आणि बदलत्या धोरणात्मक प्राधान्यांचे एक महत्त्वाचे लक्षण मानला जात आहे. विशेष म्हणजे फ्रान्सने अमेरिकेतून हा १२९ टन सोन्याचा साठा परत मिळवण्यासाठी जी पद्धत वापरली, ती आर्थिक जगासाठी एक अभ्यासाचा विषय ठरली आहे. सोन्याची प्रत्यक्ष वाहतूक करण्याऐवजी फ्रान्सने बाजारपेठेतील संधीचा फायदा घेत जो नफा कमावला, त्याने केंद्रीय बँकेची ताळेबंद स्थिती कमालीची सुधारली आहे. शंभर वर्षांहून अधिक काळ अमेरिकेच्या ताब्यात असलेले हे सोने आता फ्रान्सच्या स्वतःच्या खजिन्यात सुरक्षित आहे.



# फ्रान्सच्या सोनेनिर्णयाचा संदेश



**सीए सागर शहा**

जागतिक अर्थकारणात सोन्याचे स्थान अढळ आहे. कोणत्याही देशाच्या मध्यवर्ती बँकेकडे असणारा सोन्याचा साठा हा त्या देशाच्या आर्थिक स्थैर्याचा कणा मानला जातो. फ्रान्सच्या सोन्याच्या साठ्याचा मोठा हिस्सा बऱ्याच काळापासून अमेरिकेतील न्यूयॉर्कमध्ये फेडरल रिझर्व्हच्या तिजोरीत साठवलेला होता. शीतयुद्धाच्या काळापासून अनेक युरोपीय देशांनी सुरक्षिततेच्या कारणास्तव आपले सोने परदेशात ठेवणे पसंत केले होते. मात्र, काळाच्या ओघात आर्थिक समीकरणे बदलली आणि सोन्याच्या शुद्धतेचे जागतिक निकषही बदलले. न्यूयॉर्कमध्ये असलेल्या सोन्याच्या विटा जुन्या पद्धतीच्या आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नवीन निकषांमध्ये न बसणाऱ्या होत्या. या सोन्याच्या विटांचे शुद्धीकरण करणे किंवा त्या जहाजातून फ्रान्सला आणणे ही अत्यंत खर्चिक आणि गुंतागुंतीची प्रक्रिया होती. यादरम्यान जुलै २०२५ ते जानेवारी २०२६ या काळात सोन्याच्या किमतींनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विक्रमी उच्चांक गाठला होता. याच संधीचा लाभ घेत बँक ऑफ फ्रान्सने न्यूयॉर्कमध्ये असलेल्या १२९ टन सोन्याची विक्री करण्याचा धाडसी निर्णय घेतला. विशेष म्हणजे, हे सोने भौतिक स्वरूपात फ्रान्सला आणण्याऐवजी तिथेच विकण्यात आले. ज्यावेळी सोन्याचे भाव शिखरावर होते, नेमकी तीच वेळ साधून या सर्व सोन्याची विक्री करण्यात आली. या विक्रीतून मिळालेल्या प्रचंड निधीचा वापर करून फ्रान्सने युरोपीय बाजारपेठेतून उच्च दर्जाच्या आणि आधुनिक निकषांनुसार असलेल्या सोन्याच्या विटांची खरेदी केली. या व्यवहाराचा सर्वात मोठा फायदा म्हणजे फ्रान्सला वाहतुकीचा प्रचंड खर्च आणि विटांच्या शुद्धीकरणाचा व्याप वाचवता आला. या धोरणात्मक निर्णयामुळे बँकेला १२.८ अब्ज युरोचा अतिरिक्त लाभ झाला. विशेष म्हणजे मागील वर्षी ७.७ अब्ज युरोच्या तोट्यात असलेली बँक ऑफ फ्रान्स या व्यवहारामुळे ८.१ अब्ज युरोच्या निव्वळ नफ्यात आली आहे. एका वर्षात झालेला हा आर्थिक पालट जागतिक बँकिंग क्षेत्रासाठी अभूतपूर्व मानला जात आहे.

पॅरिसमधील जमिनीखाली साधारणपणे २९ मीटर खोल असलेल्या 'ला सुतेरेन' या अतिसुरक्षित तळघरात हे सोने ठेवण्यात आले आहे. हे तळघर जगातील सर्वात सुरक्षित ठिकाणांपैकी एक मानले जाते. या कारवाईमुळे फ्रान्स आता जगातील अशा मोजक्या देशांपैकी एक बनला आहे, ज्यांनी आपले सर्व सुवर्ण भांडवल स्वतःच्या देशात आणि स्वतःच्या नियंत्रणात ठेवले आहे.

फ्रान्सच्या या पावलाचे पडसाद शेजारील जर्मनीमध्येही उमटले आहेत. जर्मनीचा देखील मोठा सुवर्ण साठा आजही अमेरिकेत आहे. अमेरिकेतील राजकीय अस्थिरता आणि बदलती धोरणे पाहता, जर्मनीतील करदात्यांच्या संघटनांनी आता आपले सोने परत आणण्याची मागणी तीव्र केली आहे. अमेरिकेतील 'फेड'च्या तिजोरीतील सोने आता कितपत सुरक्षित आहे, असा प्रश्न जर्मन अर्थतज्ज्ञ विचारू लागले आहेत. फ्रान्सने ज्या पद्धतीने आर्थिक लाभ मिळवत आपले सोने मायदेशी आणले, तोच आदर्श आता इतर युरोपीय देशांसमोर आहे.

यापूर्वी पोलंडने २०१९ मध्येच बँक ऑफ इंग्लंडमधून १०० टन सोने परत आणले होते. जर्मनीच्या बुंडेसबँकने २०१७ पर्यंत न्यूयॉर्क आणि पॅरिसमधून ६७४ टन सोने फ्रँकफर्टला हलवून एक मोठा टप्पा गाठला होता. अलीकडेच नायजेरियासारख्या आफ्रिकन देशांनीही अमेरिकन अर्थव्यवस्थेबद्दलच्या चिंतेमुळे आपले सुवर्ण साठे परत नेण्यास सुरुवात केली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेनेही २०२४ मध्ये बँक ऑफ इंग्लंडमधून १०० मेट्रीक टन सोने मायदेशी आणले होते.

यामागे एक प्रमुख कारण म्हणजे अमेरिकेकडून घातले जाणारे निर्बंध आणि गोठवण्यात येणाऱ्या मालमत्ता. २०२२ मध्ये रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यानंतर पाश्चात्य देशांनी (जी-७ आणि युरोपीय संघ) रशियाच्या मध्यवर्ती बँकेची सुमारे ३०० अब्ज डॉलर्सची परकीय मालमत्ता गोठवली. यामध्ये मोठ्या प्रमाणात सोन्याचाही समावेश होता. या घटनेने जगातील इतर मध्यवर्ती बँकांनी धडा घेतला. ऑक्टोबर २०२३ मधील इस्त्रायल-हमास संघर्षानंतर अमेरिकेने हा निधी पुन्हा गोठवला. एप्रिल २०२६ च्या ताज्या अहवालांनुसार, पाकिस्तान मध्ये सुरू असलेल्या शांतता चर्चेत इराणने हा निधी मुक्त करण्याची मागणी केली आहे, परंतु अमेरिकेने अद्याप त्याला नकार दिला आहे. राजकीय मतभेदांमुळे आपली मालमत्ता कधीही 'अदृश्य' होऊ शकते, हे लक्षात आल्यामुळेच भारत, फ्रान्स यांसह अन्य देशांनी सावध पवित्रा घेतल्याचे दिसते. डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारख्या नेत्यांची धोरणे आणि अमेरिकेच्या भविष्यातील भूमिका याबाबतची साशंकता या निर्णयामागे निश्चितपणाने आहे असे म्हणता येईल. काही वर्षांपूर्वी महायुद्धे आणि आर्थिक मंदीच्या काळात अमेरिकेसारख्या सुरक्षित ठिकाणी सोने असणे हे धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे मानले जात असे. मात्र, शंभर वर्षांनंतर परिस्थिती बदलली आहे. आता स्वतःचे सोने स्वतःच्या देशात असणे हे सार्वभौमत्व आणि आर्थिक स्वातंत्र्याचे प्रतीक मानले जात आहे. 'वर्ल्ड गोल्ड कौन्सिल'च्या सर्वेक्षणानुसार, सुमारे ५९ टक्के मध्यवर्ती बँका आता आपल्या सोन्याचा काही भाग देशांतर्गत साठवत आहेत. २०२४ मध्ये हे प्रमाण ४१ टक्के होते. हे १८ टक्क्यांचे वाढलेले प्रमाण थेट रशियावरील निर्बंधांनंतर निर्माण झालेल्या असुरक्षिततेच्या भावनेचा परिणाम आहे.

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

## संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# समाधानाचे दान देणारी अक्षय्य तृतीया!

समाजजीवनाचा प्रवाह विचार आणि संस्कारांनी सतत समृद्ध राहावा याच व्यापक उद्देशाने भारतीय संस्कृतीने आपला विस्तार केलेला आहे. निसर्गाचे सृष्टीचक्र असेल, कालचक्र असेल याच्या गतीने किंवा कालमानाप्रमाणे केवळ दिवस, महिने, वर्ष, आयुष्य व्यतीत करणे एवढाच रूक्ष विचार न करता निसर्गामध्येच अतिशय उत्स्फूर्तपणे घडून येणारे बदल हे मनुष्याच्या मनाचा, ह्रदयाचा, एवढेच नव्हे तर शरीराचादेखील ठाव घेतात. म्हणजेच सृष्टी ज्याला निसर्ग म्हटले जाते आणि समष्टी म्हणजे त्याला समाज म्हटले जाते. या दोघांच्याही समन्वयातून सुख, समृद्धी, आनंद मिळवणे, वेगवेगळ्या कारणांनी निर्माण होणाऱ्या समस्या, संकटे, आव्हाने किंवा दुःखावर मात करण्याची मानसिकतादेखील विकसित करण्याची कल्पकता भारतीय संस्कृतीतच पाहायला मिळते. चैत्र महिन्यात वसंत ऋतू सुरू होतो. येणाऱ्या रणरणत्या उन्हापूर्वीच सृष्टीचा बराच भाग हिरव्या कोवळ्या पालवीने फुलून जातो. वर्षारंभाची ही निसर्गाची नवी सुरूवात मनाला उल्हासित करते. निराशा झटकून उल्हास वाढवते. चैत्र प्रतिपदा म्हणजेच पाडवा. साडेतीन मुहूर्तपैकी एक महत्त्वाचा मुहूर्त आणि पाठोपाठ अक्षय्य तृतीया येते. भारतासारख्या या कृषिप्रधान देशात पाणी, माती, शेती, याबद्दलची जाणीव ठेवून कृतीशील राहाण्याची प्रेरणा अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने दिली जाते. जी सृष्टी किंवा शेती भरभरून अन्नधान्य देते. त्या मातीचा कलश किंवा घट पाण्याने भरून त्याची पूजा करण्याचा आणि तो दान देण्याचा विचार मांडला गेला. तो कृतीत उतरवण्यासाठीच या घटाचे दान देण्याचा संस्कारही रूजवला गेला. पुराणातल्या कथेनुसार श्रीकृष्णाने अर्जुनाला असा उपदेश केला होता की, या दिवशी कोणत्याही स्वरूपाचे दिले जाणारे दान हे अधिक फलदायक किंवा पुण्यकारक आहे. किंबहुना आपल्याकडे असलेल्या गोष्टींपैकी कोणतीही वस्तू इतरांना देण्याची प्रवृत्ती ही समाज म्हणून साहाय्यभूत ठरते आणि सांस्कृतिकदृष्ट्या संस्कार म्हणून तितकीच मोलाची ठरते. म्हणून या दिवशी सोने, चांदी, घर, जमीन या गोष्टी खरेदी करण्याला जसे महत्त्व आहे. तसेच आपल्याकडे असलेल्या वस्तू दिल्याने आपल्याकडची संपत्ती अक्षय्य रूपात टिकून राहाण्याची एक श्रद्धा विकसित झाली.

### ईश्वरी आराधनेचा अर्थ

अक्षय्य म्हणजे कधीही न संपणारे असा त्याचा अर्थ गृहित धरल्यानंतर मग या दिवशी केली जाणारी ईश्वराची आराधनासुद्धा अक्षय्य स्वरूपाचीच ठरते. मग असेच दान नियमितपणे करता यावे म्हणून खरेदी केली जाणारी नवनवीन संपत्ती किंवा वस्तूदेखील याच दानाच्या सवयीसाठी गरजेच्या ठरतात. साडेतीन मुहूर्तपैकी एक मुहूर्त असल्याने सर्व प्रकारच्या गोष्टींसाठी तो शुभयोग मानला गेलेला आहे. सण म्हणून अक्षय्य तृतीयेचे महत्त्व मान्य करीत असताना त्या निमित्ताने जपला गेलेला विचार हा अधिक अक्षय्य किंवा चिरंतन स्वरूपाचा ठरतो. मनुष्याचा किंवा समाजाच्या वृत्ती प्रवृत्ती लक्षात घेतल्या तर स्वार्थीपणा ठायीठायी दिसून येतो. परंतु मनुष्यजीवनाचा आनंद उपभोगताना सामाजिक स्तरावरचे हे आदान प्रदानाचे व्यवहार अधिक समाधान देणारे ठरतात. म्हणजेच या अक्षय्य तृतीयेच्या मूळ उद्देशाचा विचार करताना व्यक्ती किंवा समाजामध्ये समाधानाची वृत्ती अक्षय्य टिकून राहावी असाच विचार संस्काररूपातून दृढ केला गेला. एरवी कधीही माती किंवा पाण्याविषयी आपण फार विचार करत नाही. पण त्या मातीतून बनवलेला कुंभ किंवा घट हा वैशाखाच्या रणरणत्या उन्हात तहान भागवणारा ठरतो. त्यातून केले जाणारे जलदान हे देणाऱ्याला तर समाधान देतेच. परंतु घेणाऱ्यालासुद्धा आपण संतुष्ट झाल्याचे भाव निर्माण करून जाते. माती किंवा पाण्यासारखी खऱ्या अर्थाने ही विपुल संपत्ती आहे. त्या संपत्तीचे घट आणि जलरूपात केले जाणारे दान म्हणजे माती आणि पाण्याविषयी व्यक्त झालेला नम्रभावसुद्धा ठरतो. कोणतीही किंमत न मोजता जी माती व्यक्ती समाजाचे पालनपोषण करते, पाण्याला तर जीवनच म्हटले गेलेले आहे. या दोन्ही गोष्टींविषयीचा आदरभाव व्यक्त करण्याचेसुद्धा अक्षय्य तृतीया हे निमित्त मानले पाहिजे.

### सणांची सशक्त शृंखला

सृष्टीमध्ये माती आणि पाणी या दोन्ही गोष्टी अक्षय्य स्वरूपातच आहेत. म्हणजे या कधीही क्षय पावत नाहीत त्यांची होणारी पूजा, आराधना दानाच्या स्वरूपामध्ये प्रस्थापित करणे यामागे असलेली उदात्तता ही फक्त भारतीय संस्कृतीमधूनच अनुभवता येते. अन्यथा एक सणासारखा सण, पूजेचे कर्मकांड आणि गोडाधोडाचे खाणे एवढ्यापुरता त्याचा मर्यादित अर्थ राहू शकला असता. परंतु अतिशय छोट्या छोट्या कृतीमध्ये संस्कृतीचे रहस्य दडवून ठेवण्याची अलौकिकता समजून घेतली पाहिजे. आनंद, सुख, समाधान या गोष्टी कितीही पैसा असला तरी विकत घेता येऊ शकत नाहीत. पैशातून घेतलेल्या सुखवस्तूमधले समाधान हे तात्पुरत्या स्वरूपाचे असते. ते समाधान जर कायम टिकावे असे वाटत असेल तर भारतीय संस्कृतीची ही सणशृंखला एका चिरंतन समाधानाचे दान देणारी ठरते. ऋतुमानातला बदल आणि त्या त्या काळातली व्यक्ती आणि समाजाच्या मनाची अवस्था लक्षात घेऊन अक्षय्य तृतीयेसारखा सण साजरा होतो. उन्हाळ्यात पाण्याचे महत्त्व लक्षात येते आणि म्हणूनच या दिवसापासून ठिकठिकाणी पाणपोई सुरू केल्या जातात. कोकणामध्ये शेतीच्या मशागतीलादेखील याच दिवसापासून सुरूवात होते. परशुरामाची जयंती असल्याने पुरुषार्थ आणि समाजासाठीच उपयुक्त ठरणारा पराक्रम याचाही संदेश परशुराम जयंतीच्यानिमित्ताने दिला जातो. निमित्त आणि औचित्य यांचा हा समन्वय जीवन जगण्याच्या प्रेरणा ठरत आलेल्या आहेत. समृद्धता ही विचार, संस्कार आणि त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीतून अनुभवता येते. प्राचीन काळापासूनच्या या सगळ्या परंपरा भारतीय समाजव्यवस्थेला सशक्त करीत आल्या आहेत.


## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

आयुष्यात हिशोब ठेवत चला. कारण वेळ सरली की,जवळचेच विचारतात, तुम्ही आमच्यासाठी काय केलं?

## पंचांग





रविवार, १९ एप्रिल २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर

* वैशाख शुक्ल द्वितीया
* नक्षत्र - भरणी/ कृत्तिका
-: जन्मराशी :-
००-०१ ते १२-३१ मेष
१२-३२ ते २४-०० वृषभ

रवी उदय- ०६-२०
रवी अस्त- १८-५६

**अक्षय्य तृतीया, श्री बसवेश्वर जयंती, श्री परशुराम जयंती, मुस्लीम जिल्काद मासारंभ**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

## पाककृती



### आंबा श्रीखंड

आता बाजारात बऱ्यापैकी आंबे आले आहेत. आज अक्षय्य तृतीया आहे. अक्षय्य तृतीयेला आंब्याला खूप महत्त्व असते. यामुळे घरोघरी आंब्याचा रस, पुरी, आंब्याचे रायते, आंबा सरबत, आंबा जाम असे विविध पदार्थ आवडीने बनवले जात आहेत. पण आंब्याचे श्रीखंड म्हणजेच आम्रखंडाची बातच काही और आहे. आंब्याची प्युरी आणि दह्यापासून बनवलेले आम्रखंड कसे बनवायचे त्याची रेसिपी बघूया.



★ **साहित्य :-** ४ - आंबा, १ टीस्पून हिरवी वेलची, ५० ग्रॅम बदाम, २५० ग्रॅम साखर, एक कप दही, १ चिमूट केशर, ५०० मिली फुल क्रीम दूध.

★ **कृती :-** एका भांड्यात साखर आणि दूध घट्ट होईपर्यंत फेटत राहा. नंतर त्यात एक चमचा घट्ट दही घालून सेट होऊ द्यावे. त्यानंतर हे मिश्रण कापडात बांधा. त्यातील पाणी पूर्ण जाईपर्यंत लटकवून ठेवा. नंतर आंब्याची प्युरी, वेलची पावडर आणि केशर घालून चांगले मिक्स करावे लागेल. त्यावर चिरलेले बदाम घालून तासभर थंड होण्यासाठी फ्रीजमध्ये ठेवा. आम्रखंड तयार झाल्यानंतर पुरीसोबत सर्व्ह करा.
दही आंबट नसावे, गोड ताज्या दह्याचा वापर करा. चक्कामधील पाणी पूर्ण निथळलेले असावे.

## क्रीडा



# दिल्लीचा ६ विकेट राखून सनसनाटी विजय

## मिलरच्या निर्णायक फटकेबाजीपुढे बंगळुरु गारद

**बंगळुरुच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर आज शेवटच्या षटकापर्यंत आलेल्या आयपीएलच्या २६ व्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुवर ६ विकेट राखून सनसनाटी विजय मिळवला. बंगळुरुने दिलेल्या १७६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीला शेवटच्या षटकात विजयासाठी १५ धावांची आवश्यकता होती. त्यावेळी दिल्लीच्या डेव्हिड मिलरने २ षटकार आणि १ चौकार मारुन हा सामना १ चेंडू शिल्लक ठेवून जिंकला. दिल्लीचा हा तिसरा विजय आहे.**



■ बंगळुरु

**दिल्लीने** प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. बंगळुरुचे सलामीवीर फिलिप सॉल्ट आणि विराट कोहली यांनी सावध सुरुवात केली. पहिल्या विकेटसाठी या जोडीने ५२ धावांची भागीदारी रचली. मग विराट कोहली १३ चेंडूत १९ धावा करून बाद झाला. त्यानंतर देवदत्त पडिक्कलही फार काही करू शकला नाही आणि १८ धावांवर माघारी परतला. एक बाजू सॉल्टने सावरली, तर दुसऱ्या बाजूला विकेटची रांग लागली. रजत पाटीदार ८, टिम डेविड २६, जितेश शर्मा १४, रोमारियो शेफर्ड १ आणि कृणाल पांड्या १२ धावांवर बाद झाले. मात्र, फिलिप सॉल्टने ३८ चेंडूत ४ चौकार आणि ३ षटकारांसह ६३ धावांची आक्रमक खेळी केली. त्यामुळे बंगळुरुने ८ बाद १७५ धावांपर्यंत मजल मारली. या धावसंख्येचा पाठलाग करणाऱ्या दिल्लीला पहिल्याच षटकात धक्का बसला. पाथुम निस्संका केवळ १ धाव करून भुवनेश्वर कुमारच्या गोलंदाजीवर पायचीत झाला. करुण नायर ५ धावांवर आणि समीर रिझवी ३ चेंडूत २ धावांवर बाद झाला. भुवनेश्वर कुमारने सुरुवातीला ३ विकेट घेत दिल्लीला मोठा धक्का दिला. मात्र, के.एल. राहुलने ३४ चेंडूत ६ चौकार आणि २ षटकारांसह ५७ धावांची खेळी केली. कर्णधार अक्षर पटेल १९ चेंडूत २६ धावा करून रिटायर्ड झाला. दिल्लीला शेवटच्या षटकात विजयासाठी १५ धावांची गरज होती. बंगळुरुने चेंडू रोमारियो शेफर्डकडे सोपवला. या षटकाच्या पहिल्या २ चेंडूवर मिलर आणि स्टब्सने प्रत्येकी एक धाव घेतली. त्यानंतर मिलरने तिसऱ्या आणि चौथ्या चेंडूवर खणखणीत षटकार आणि पाचव्या चेंडूवर चौकार मारून संघाला विजय मिळवून दिला. ट्रिस्टन स्टब्सने ४७ चेंडूंत १ षटकार आणि ४ चौकारांसह नाबाद ६० धावा आणि डेव्हिड मिलरने १० चेंडूंत २ षटकारांसह १ चौकारासह नाबाद २२ धावा केल्या.

## आज कोलकाताची तगड्या राजस्थानशी लढत
## पंजाबचा संघ अव्वल स्थान कायम ठेवणार

■ कोलकाता

आयपीएलमध्ये उद्या दोन सामने होणार आहेत. त्यातील दुपारी ३.३० वाजता कोलकाताच्या ईडन गार्डन्सवर कोलकाता नाईट रायडर्सचा संघ तगड्या राजस्थान रॉयल्सशी लढत करणार आहे. तर रात्री ७.३० वाजता न्यू चंदीगडच्या महाराजा यादविंद्र सिंग स्टेडियमवर पंजाब किंग्स आणि लखनौ सुपर जायंट्स आमनेसामने येणार आहे. सातवा सामना खेळण्यासाठी सज्ज झालेला कोलकाताचा संघ अद्याप पहिल्या विजयाच्या शोधात आहे, तर हा सामना



पंजाब अव्वल स्थान कायम ठेवण्याचा प्रयत्न करणार आहे. राजस्थानने आतापर्यंत चांगली कामगिरी केली असून पाचपैकी चार सामन्यांत विजय मिळवला आहे. तर एका सामन्यात हैदराबादविरुद्ध पराभव पत्करावा लागला आहे. त्यामुळे राजस्थान गुणतालिकेत ८ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. पंजाबनेही दमदार कामगिरी केली आहे. पाचपैकी चार सामन्यांत विजय मिळवला आहे. एक सामना पावसामुळे रद्द झाला. परिणामी पंजाब ९ गुणांसह अव्वल स्थानी विराजमान आहे. लखनौच्या कामगिरीत मोठे चढउतार राहिले आहेत. लखनौने पाचपैकी २ सामने जिंकले आहेत. तीन सामन्यांत पराभव झाला आहे. त्यामुळे लखनौ ४ गुणांसह सातव्या स्थानावर आहे.

## नोव्हाक जोकोविचची माद्रिद ओपनमधून माघार

■ माद्रिद

२४ **वेळा** ग्रँड स्लॅम विजेता ठरलेल्या नोव्हाक जोकोविचने दुखापतीमुळे माद्रिद ओपनमधून माघार घेतली. ही स्पर्धा २३ एप्रिल रोजी सुरू होणार आहे. इन्स्टाग्रामवरुन जोकोविचने सांगितले की, मी यावर्षी माद्रिद ओपनमध्ये सहभागी होऊ शकणार नाही. लवकरच परत येण्यासाठी मी माझी प्रकृती सुधारत आहे. लवकरच भेटू. स्पर्धेच्या आयोजकांनीही एक निवेदन जारी करून सांगितले की, तीन वेळचा चॅम्पियन जोकोविच यावर्षी स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नाही आणि तो लवकरच परत येईल अशी आशा व्यक्त केली.



## हैदराबादचा चेन्नईवर १० धावांनी विजय

■ हैदराबाद

**हैदराबादच्या** राजीव गांधी स्टेडियमवर आज चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध आयपीएलचा २७ वा सामना सनरायझर्स हैदराबादने १० धावांनी राखून जिंकला. चेन्नईचा हा चौथा पराभव आहे. हैदराबादने निर्धारित षटकात ९ बाद १९४ धावा ठोकल्या होत्या. या प्रत्युत्तरात चेन्नईने ८ बाद १८४ धावा केल्या. या विजयासह हैदराबादने आयपीएलच्या गुणतालिकेत ६ गुणांसह चौथ्या स्थानावर उडी घेतली.

हैदराबादकडून अभिषेक शर्माने २२ चेंडूंत ४ षटकार आणि ६ चौकारांसह ५९ धावा ठोकल्या. त्याला हेनरिक क्लासेनने चांगली साथ देऊन ३९ चेंडूंत ५९ धावा केल्या. हैदराबादने दिलेल्या १९४ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना चेन्नईच्या आयुष म्हात्रेने आक्रमक खेळी करण्याचा प्रयत्न केला. मात्र तो १३ चेंडूंत ३० धावा करुन माघारी परतला. शिवम दुबे आणि मॅथ्यू शॉर्ट यांच्यासमोर विजयासाठी ३० चेंडूंत ५४ धावांची गरज असताना ही जोडी फुटली. मॅथ्यू शॉर्ट ३० चेंडूंत ३४ धावा करुन झेलबाद झाला. मग त्यापाठोपाठ दुबेचा साकिब हुसेनने त्रिफळा उडवला. त्याने १६ चेंडूंत २१ धावा केल्या. जेमी ओव्हरटन आणि अंशुल कंबोज यांच्यापुढे विजयासाठी शेवटच्या ६ चेंडूंत १८ धावांची आवश्यकता होती. मात्र हैदराबादचा गोलंदाज प्रफुलने प्रभावी माऱ्या करुन या जोडीला मोठे फटके मारता आले नाही. त्यामुळे चेन्नई १० धावांनी विजयापासून दूर राहिला.

## भारत पेट्रोलियमचा संघ ठरला ओम ज्ञानदीप चषकाचा मानकरी

■ मुंबई

**ओम** ज्ञानदीप मंडळाने आयोजित केलेल्या या हंगामातील पहिल्या पुरुष व्यावसायिक गट कबड्डी स्पर्धेत भारत पेट्रोलियम संघ अंतिम विजेता ठरला. भारत पेट्रोलियम संघाचा अनिल जस्ता स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला.

वरळी स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावरील स्व. अमित वजराटकर क्रीडानगरीतील मॅटवर झालेल्या अंतिम सामन्यात भारत पेट्रोलियमने पूर्वार्धातील १५-२१ अशा पिछाडीवरून युवा पलटनचा कडवा प्रतिकार ४३-३९ असा मोडून काढत रोख एक लाख पन्नास हजार व ओम ज्ञानदीप चषक आपल्याकडे खेचून आणला. उपविजेत्या युवा पलटनला चषक व रोख एक लाख रुपयांवर समाधान मानावे लागले. युवा पलटनने पहिल्याच चढाईत गुण घेत आश्वासक सुरुवात केली. सलग ३ गुण गमावल्यानंतर पेट्रोलियमने पकड करत पहिला गुण घेतला. पण युवाच्या किशन जाट याने एकाच चढाईत ३ गडी टिपत ७ व्या मिनिटाला पेट्रोलियमवर पहिला लोण दिला आणि १०-०३ अशी आघाडी घेतली. विश्रांतीला २१-१५ अशी युवा पलटनकडे आघाडी होती. पण उत्तरार्धात पेट्रोलियमच्या अनिल जस्ता, मिलन दहिया यांनी जोरदार आक्रमण करीत संघाला विजय मिळवून दिला.

## कॅरम स्पर्धेत आर्यन, उमैरची विजयी दौड

■ मुंबई

**आनंदराव** अडसूळ चॅरीटेबल ट्रस्ट, को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन-मुंबई व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून सुरू झालेल्या पहिल्या टप्प्यातील निवड चाचणी शालेय कॅरम स्पर्धेत जैतापूरचा आर्यन राऊत, मुंबई उपनगरचा उमैर पठाण आदींनी विजयीदौड केली. न्यू इंग्लिश स्कूल-जैतापूरच्या आर्यन राऊतने राष्ट्रीय दर्जाची सबज्युनियर कॅरमपटू तनया दळवीवर १७-३ असा विजय मिळविताना उत्तरार्धात अचूक फटक्यांची आतषबाजी केली. महात्मा गांधी विद्या मंदिरच्या तनया दळवीने प्रारंभी छान खेळ करूनही पराभव पत्करला.

## श्रीराम विश्वस्त, जय हनुमान आणि डॉन बॉस्को उपांत्य फेरीत

■ ठाणे

**ओम** वर्तकनगर, स्वराज्य स्पोर्टस्, विवेक स्पोर्टस्, मिडलाईन यांनी श्री मावळी मंडळाने आयोजित केलेल्या ७३ व्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत उपांत्य फेरी गाठली. पुरुषांत श्रीराम विश्वस्त, जय हनुमान, डॉन बॉस्को, मिडलाईन यांनी उपांत्य फेरी गाठण्याचा मान पटकविला. ठाणे येथील श्री मावळी मंडळाच्या पटांगणावर सुरू असलेल्या चौथ्या दिवशी महिलांच्या उपांत्यपूर्व सामन्यात ठाण्याच्या ओम वर्तकनगरने जय भारत स्पोर्ट्सचा ४१-१४ असा धुव्वा उडवित आगेकूच केली.

सुरुवातीपासून आक्रमक खेळ करत पूर्वार्धात २ लोण देत २५-०६ अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात आणखी एक



लोण देत सामन्यावरील पकड घट्ट करीत मोठ्या फरकाने सामना खिशात टाकला. वैष्णवी साळुंखे, पूर्वा इंगवले, पूजा जाधव यांचा चतुरस्त्र खेळ या विजयात महत्त्वाचा ठरला. जय भारतची श्रेया गावंड एकाकी लढली. दुसऱ्या सामन्यात उपनगरच्या स्वराज्य स्पोर्ट्सने मुंबईच्या बलाढ्य अशा शिवशक्ती महिला संघाचा प्रतिकार ३५-३३ असा मोडून काढला. पहिल्या डावात १०-२० अशा १० गुणांनी पिछाडीवर पडलेल्या स्वराज्यने दुसऱ्या डावात जोरदार मुसंडी मारत विजयश्री खेचून आणली. सानिका चौघुले, याशिका पुजारी यांच्या तुफानी चढायांना समृद्धी मोहिते, प्रतिक्षा तांडेल यांची मिळालेली बचावाची भक्कम साथ यामुळे स्वराज्यने विजय मिळविला. शिवशक्तीच्या शुभदा खोत, ऋणाली भुवड, पौर्णिमा जेधे यांचा पहिल्या डावातील जोश दुसऱ्या डावात टिकला नाही. विवेक स्पोर्ट्सने रायगडच्या कर्नाळा स्पोर्ट्सला ३९-१६ असे नमवत उपांत्य फेरी गाठली. विश्रांतीपर्यंतच्या खेळात एक लोण देत १९-०९ अशी आघाडी घेणाऱ्या विवेकने विश्रांतीनंतर आणखी दोन लोण देत आपला विजय सोपा केला.

नवाकाळ

Email- contact@navakal.in  www.navakal.in  /navakalofficial

# करोडपती मुलाला धडा शिकवला

**आई, तू या घरात फुकट जेवतेस आणि राहतेस! २२ लाखांचे दागिने देऊनही पोराने जेवताना आईचा अपमान केला... पण दुसऱ्या दिवशी आईने असा 'गेम' फिरवला की करोडपती लेकाने थेट आईचे पाय धरले!**

- महेश पवार

नागपूरच्या धरमपेठ भागात ६२ वर्षांच्या 'अनुराधाताई' (अनुताई) राहत होत्या. त्या एका शाळेतून मुख्याध्यापिका म्हणून निवृत्त झाल्या होत्या. त्यांच्या पतीचे खूप आधीच निधन झाले होते. अनुताईंनी एकट्याने स्वतःच्या अंगावर खस्ता खाऊन आपला एकुलता एक मुलगा, 'सौरभ' याला एमबीए (MBA) पर्यंत शिकवले होते.

सौरभला स्वतःचा 'ऑरेंज एक्सपोर्ट आणि कोल्ड स्टोरेज' (संत्री निर्यात) चा मोठा बिझनेस सुरू करायचा होता. पण बँकेकडून पुरेसे कर्ज मिळत नव्हते. मुलाचे स्वप्न पूर्ण व्हावे म्हणून अनुताईंनी स्वतःच्या रिटायरमेंटचे ३० लाख रुपये आणि स्वतःच्या अंगावरचे २२ लाखांचे सोन्याचे दागिने (मंगळसूत्र आणि पाटल्या) विकून सौरभच्या हातात दिले. वर्धा रोडवर सौरभचा बिझनेस थाटात सुरू झाला. त्याची बायको, 'मिताली' हिलाही नवऱ्याच्या या यशाचा भयंकर गर्व झाला होता.

**तो अपमानाचा प्रसंग आणि अन्नावरून काढलेली लायकी:**

बिझनेसला दोन वर्षे पूर्ण झाली. सौरभला आता बिझनेस वाढवण्यासाठी आणि नवीन ट्रक्स घेण्यासाठी आणखी पैशांची गरज होती. त्याची नजर अनुताईंच्या 'पोस्ट ऑफिसमध्ये' असलेल्या शेवटच्या २५ लाखांच्या फिक्स डिपॉझिटवर (FD) होती. ही एफडी अनुताईंनी म्हातारपणाच्या आजारपणासाठी आणि स्वतःच्या सुरक्षिततेसाठी ठेवली होती.

रविवारी रात्री डायनिंग टेबलवर जेवताना सौरभने विषय काढला. आई, मला ते तुझे पोस्टातले २५ लाख रुपये दे. माझा बिझनेस वाढतोय. अनुताई शांतपणे म्हणाल्या, बाळा, मी माझं सर्वस्व तुला दिलंय. आता तेवढेच २५ लाख माझ्या म्हातारपणाची काठी आहेत. उद्या मला दवाखाना लागला तर मी कुणापुढे हात पसरू? ते पैसे मी मोडणार नाही.

नकाराचा शब्द ऐकताच सौरभचा अहंकार दुखावला. ताटात जेवत असलेला सौरभ संतापाने उठला आणि दातओठ खात ओरडला, अरे कसले म्हातारपण आणि कसला दवाखाना? इथे आम्ही तुला पाळतोय ना? आई, तू या घरात 'फुकट' राहतेस आणि 'फुकट' जेवतेस! माझ्या पैशांवर जगतेस तू! माझा बिझनेस वाढतोय पण तुला तुझे पैसे द्यायला जीव जडतोय? फुकटचं खायला मात्र बरोबर चालतं! सून मिताली बाजूला उभी राहून हसत होती. ज्या आईने स्वतःचे मंगळसूत्र विकून पोराचा बिझनेस उभा केला, तिलाच आज पोरगा अन्नावरून 'फुकटी' म्हणत होता!

अनुताईंच्या काळजाचे हजार तुकडे झाले. डोळ्यांतून पाणी आलं, पण त्या एक शब्दही बोलल्या नाहीत. त्यांनी निमूटपणे स्वतःच्या ताटातला घास तिथेच सोडला, हात धुतले आणि त्या शांतपणे आपल्या खोलीत जाऊन झोपल्या.

**तो सत्याचा स्फोट आणि आईचा स्वाभिमानी प्रहार:**

सौरभला वाटले, आई म्हातारी आहे, दोन दिवस रडेल आणि गप्प बसेल. पण दुसऱ्या दिवशी सकाळी सौरभ ऑफिसला जाण्यापूर्वीच अनुताई घरातून बाहेर पडल्या होत्या.

दुपारी २ वाजता सौरभ त्याच्या वर्धा रोडच्या केबिनमध्ये बसला होता, तेवढ्यात त्याचा मॅनेजर धावत आला.

सर! बँकेने आपले सर्व अकाउंट्स 'फ्रीज' (Freeze) केले आहेत. आणि आपल्या कोल्ड स्टोरेजच्या गेटवर कोर्टाची नोटीस लागली आहे!

सौरभच्या पायाखालची जमीनच सरकली. तो पळत गेटवर आला. तिथे एक नोटीस चिकटवली होती आणि समोर त्याचे वकील उभे होते.

सौरभने विचारले, हे काय आहे?



वकील कडक आवाजात म्हणाले, सौरभ, ज्या अर्धा एकर जागेवर तू हे ऑफिस आणि कोल्ड स्टोरेज उभा केलंयस ना... ती जागा तुझ्या आईच्या (अनुताईंच्या) नावावर आहे! मुलाचा बिझनेस म्हणून तिने तुला ती जागा गेल्या ३ वर्षांपासून 'फुकट' वापरायला दिली होती.

आज सकाळी तुझ्या आईने स्वतः इथे येऊन बँकेचं 'ना हरकत प्रमाणपत्र' (NOC) रद्द केलंय व तुला १५ दिवसांत ही जागा रिकामी करण्याची कायदेशीर नोटीस (Eviction Notice) पाठवली आहे. तसंच, गेल्या ३ वर्षांचं या कमर्शियल जागेचं भाडं (Rent) जे '३६ लाख ' होते ते तू न भरल्यामुळे तुझ्यावर केस ठोकली आहे!

**अहंकाराचा चक्काचूर आणि गुडघे टेकलेला लेक:**

हे ऐकताच सौरभचा श्वास अक्षरशः कोंडला गेला! बँकेचे अकाउंट्स फ्रीज झाल्यामुळे त्याचे परदेशात जाणारे कंटेनर्स थांबले होते. आईने एका झटक्यात त्याचा करोडोंचा बिझनेस रस्त्यावर आणून ठेवला होता.

सौरभ वेड्यासारखा गाडी चालवत घरी आला. घरात अनुताई त्यांची बॅग भरत होत्या.

सौरभ धावत गेला आणि त्याने थेट अनुताईंच्या पायांवर लोळण घेतली! तो ओक्साबोक्शी रडत म्हणाला, आई... आई मला माफ कर! माझा बिझनेस बुडेल ग. मी रागाच्या भरात बोलून गेलो. ती नोटीस मागे घे आई... तुझे पाय धरतो मी!

अनुताईंनी अत्यंत निष्ठुरपणे आपले पाय मागे घेतले. त्यांच्या चेहऱ्यावर कालची ती लाचारी नव्हती, तर एका स्वाभिमानी स्त्रीचे तेज होते.

त्या म्हणाल्या, सौरभ, तू काल मला म्हणालास ना की मी तुझ्या घरात 'फुकट' जेवते? बाळा, मी शिक्षिका आहे, फुकटचं खाणं माझ्या रक्तात नाही! तुझ्या या कोल्ड स्टोरेजच्या जागेचं ३ वर्षांचं भाडं ३६ लाख रुपये होतं. मी काल रात्री हिशोब केला... मी तुझ्या घरात जेवलेल्या अन्नाची आणि राहिलेल्या जागेची किंमत त्यातून वजा केली, तरीही तूच माझा कर्जदार निघतोस!

माझा हिशोब आज चुकता झालाय! ज्या आईने तुला जन्म दिला, तिला दोन घासांसाठी 'फुकटी' ठरवणाऱ्या पोराच्या घरात मला एक सेकंदही राहायचं नाही. आता तो तुझा बिझनेस आणि ती तुझी बँक तू बघ... मी माझा मार्ग मोकळा केलाय!

अनुताईंनी स्वतःची बॅग उचलली आणि ताठ मानेने त्या घरातून कायमच्या बाहेर पडल्या. सौरभ आणि त्याची बायको मिताली रस्त्यावर उभं राहून रडत होते. करोडोंचा बिझनेस करणारा पोरगा आज एका म्हाताऱ्या आईच्या स्वाभिमानासमोर कायमचा 'भिकारी' झाला होता!

# भुता हायस्कूलमध्ये पपेट शो विद्यार्थ्यांना स्वच्छतेचा संदेश

**वंचित घटकांतील विद्यार्थ्यांचाही सहभाग**

■ मुंबई



**अंधेरी** पूर्व येथील श्री नागरदास धारसी भूता हायस्कूलमध्ये १७ व १८ एप्रिल रोजी शैक्षणिक पपेट शोचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात अंगणवाडीतील तसेच वंचित घटकांतील विद्यार्थ्यांनाही सहभागी करून घेण्यात आले. कार्यक्रमाला बालविकास प्रकल्प अधिकारी राधिका चिमटे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. ट्रस्टी, शैक्षणिक संचालक, शिक्षक, पालक व पी.टी.ए. सदस्यही मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेच्या शिक्षिकांनी 'एली नावाचा हत्ती' या कथानकावर आधारित कठपुतली नाट्य सादर केले. या कथेत एली केळीची साल रस्त्यावर टाकल्याने इतर प्राणी घसरतात आणि शेवटी स्वतः एलीलाही त्याचा फटका बसतो. त्यानंतर तो स्वच्छता राखण्याचा संकल्प करतो. या सादरीकरणातून 'कचरा कचरापेटीत टाका' हा स्वच्छतेचा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्ती, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव वाढण्यास मदत झाली. पालकांनी या उपक्रमाचे कौतुक केले असून, भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले.

# १६०० चौरस फुटाचीच घरे म्हाडा ठाम! अदानी बिल्डर

■ मुंबई

**गोरेगावमधील** मोतीलाल नगरच्या पुनर्विकास प्रकल्पात १४० एकर क्षेत्रावर ३५ हजार कुटुंबांना घरे मिळणार आहेत. अदानी समूह या प्रकल्पाचा बिल्डर आहे. सध्या मोतीलाल नगरमध्ये सुमारे ४,५०० कुटुंबे राहतात. मूळ रहिवाशांना १,६०० चौरस फुटाची घरे देण्यात येणार आहेत. याआधी प्रस्तावित असलेले १,३८० चौरस फूट क्षेत्र आता वाढवण्यात आले आहे. अतिरिक्त चटई क्षेत्राचा भार म्हाडा आणि अदानी रिअल्टी यांच्यात समसमान वाटला जाणार आहे. या प्रकल्पाला काही स्थानिकांचा विरोध असून त्यांनी १६०० चौ फुटापेक्षा अधिक जागेची मागणी केली आहे.

याबाबत म्हाडाचे अध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्यासोबत नुकतीच बैठक झाली तेव्हा जयस्वाल यांनी स्पष्ट केले की १६०० चौ. फुटापेक्षा जागा वाढवून देता येणार नाही. रहिवाशांना हा पुनर्विकास नको असेल तर मी हा प्रकल्प बंद करतो. जयस्वाल यांनी ही भूमिका घेतल्यानंतर हा प्रकल्प अखेर मंजूर झाल्याचे समजते.

# गिरगाव आणि दक्षिण मुंबई येथील मराठी शाळा वाचवण्यासाठी बैठक संपन्न

■ मुंबई



**गिरगाव** आणि दक्षिण मुंबई येथील मराठी शाळा वाचवण्यासाठी चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूलच्या मुख्याध्यापिका संचिता गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली युनियन हायस्कूल, चिकित्सक हायस्कूल आणि कमळाबाई मुलींची शाळा यांच्या विश्वस्त-संचालक, शिक्षक मंडळाची संयुक्त बैठक चिकित्सक शाळेच्या सभागृहामध्ये १० एप्रिल रोजी संपन्न झाली.

सदर प्रसंगी मराठी शाळेमधील पटसंख्या वाढवणे, शाळेतील शिक्षणाचा दर्जा उंचावणे आणि विविध शैक्षणिक उपक्रम यांच्या विषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमात चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी गेल्या अनेक वर्षात दैदीप्यमान यश प्राप्त केल्याबद्दल मुख्याध्यापिका संचिता गावडे यांचा सत्कार कमलाबाई हायस्कूलच्या विश्वस्त संचालिका मिनल प्रवीण जुवाटकर यांच्या हस्ते करण्यात आला.

सदर बैठकीस युनियन हायस्कूलचे संचालक विश्वस्त, मुख्याध्यापिका, कीपफीट व्यायाम शाळेचे संचालक अरुण कुरळे सुप्रसिद्ध मूर्तिकार पाटकर, गणेश चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष प्रवीण जुवाटकर, गिरीश आचरेकर आणि चिकित्सक समूह शिरोळकर हायस्कूलचा शिक्षकवृंद सहभागी झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिजीत देवरुखकर यांनी केले.

# नाशिक-सिन्नर सिटीलिंक बससेवा ठप्प चालकांच्या मारहाणीनंतर बहिष्कार

■ नाशिक

**नाशिक-सिन्नर** मार्गावरील सिटीलिंक बससेवा गेल्या काही दिवसांपासून पूर्णपणे ठप्प झाल्याने प्रवाशांचे मोठे हाल होत आहेत. विशेषतः परीक्षा तोंडावर असलेल्या विद्यार्थ्यांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. चालकांच्या वाढत्या मारहाणीच्या घटनांमुळे बस चालविण्यास चालकांनी नकार दिल्याने ही परिस्थिती निर्माण झाली आहे.

नाशिक महानगरपालिका मार्फत सुरू करण्यात आलेली सिटीलिंक सेवा शहर व ग्रामीण भागातील नागरिकांसाठी महत्त्वाची वाहतूक सुविधा ठरली होती. नाशिक-सिन्नर मार्गावर दररोज सुमारे १२ ते १५ फेऱ्या होत होत्या. मात्र, अलीकडील काळात चालक-वाहक आणि प्रवाशांमध्ये वाद वाढले. अनियमित थांबे, आसन व्यवस्थेवरून वाद आणि काही ठिकाणी चालकांवर झालेल्या मारहाणीमुळे अखेर चालकांनी या मार्गावर सेवा देण्यास नकार दिला. परिणामी १२ एप्रिलपासून बससेवा बंद आहे.

# परळमध्ये स्वामी समर्थ मठाचा वर्धापन दिन

■ मुंबई

**परळमधील** श्री स्वामी समर्थ सेवा मंडळाच्या वतीने अक्षय तृतीयेनिमित्त रविवारी श्री स्वामी समर्थ मठाचा वर्धापन दिन साजरा होणार आहे. यादिवशी सकाळी ८ वाजता स्वामी लघु रुद्र अभिषेक, ९.३० वाजता होम हवन, सकाळी १० वाजता बलिदान पुर्णाहुती, कुमारिका पुजन, १०.३० वाजता आरोग्य शिबीर, सायंकाळी ७ वाजता आरती आणि ७.३० वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# वसई-विरार पालिकेत चार नवीन समित्या

■ विरार

**प्रशासकीय** कामात पारदर्शकता आणि विकासकामांना गती देण्यासाठी वसई-विरार महापालिकेने ४ समित्यांची स्थापना केली आहे. अंदाजपत्रक समिती, निविदा समिती, शहर सौंदर्यीकरण समिती आणि शहरी वाहतूक सुधारणा समित्यांचा समावेश आहे.

पृथ्वीराज बी.पी. यांनी नुकताच महापालिका आयुक्त म्हणून पदभार स्वीकारला आहे. त्यांनी कामाचे नियोजन आणि पारदर्शकता यावर भर दिला आहे. त्यासाठी या ४ समित्यांची स्थापना केली आहे. विकास कामातील गैरप्रकार रोखण्यासाठी अंदाजपत्रक



समिती काम करणार आहे. विकासकामाचे दर आणि अंदाजपत्रक यांची तपासणी करणे अशी महत्त्वपूर्ण कामे समितीकडून केली जाणार आहेत. निविदा प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी निविदा समिती गठीत करण्यात आली आहे. कामासाठी कंत्राटदारांची निवड करताना पारदर्शकता राखणे, निविदांमधील अटी-शर्तींची पडताळणी करणे आणि योग्य कंत्राटदाराची निवड या समितीकडून होणार आहे. शहराच्या सौंदर्यीकरणासाठी खासगी विकासक आणि वास्तूविशारदांच्या माध्यमातून विविध योजना राबविल्या जाणार आहेत. त्यासाठी शहर सौंदर्यीकरण समिती काम करणार आहे.

# आजीच्या हत्येप्रकरणी नातवाचा जामीन फेटाळला

■ मुंबई

**वांद्रे** येथे राहणाऱ्या आपल्या आजीची हत्या केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या ख्रिस्तोफर परेरा याचा जामीन अर्ज मुंबई सत्र न्यायालयाने फेटाळला आहे. आरोपीच्या मानसिक स्थितीचा विचार करता त्याला जामिनावर मुक्त करणे योग्य नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

ऑक्टोबर २०२१ मध्ये आरोपीने घरात आजीसोबत असताना तिच्यावर हल्ला करून तिची हत्या केली. घटनेनंतर तो काही काळ मृतदेहाजवळच थांबला होता. त्यानंतर पोलिसांनी त्याला अटक केली. गंभीर स्वरूपाच्या या प्रकरणामुळे आरोपीला सध्या जामीन देणे योग्य ठरणार नाही, असे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळला.

# उपसंचालकांना हटवा! शिक्षकांचे आझाद मैदानात धरणे आंदोलन

**शालार्थ प्रकरणे मार्गी लावण्याची मागणी**

■ मुंबई

**शिक्षण** उपसंचालक राजेश कंकाळ यांना पदावरून हटवण्याच्या मागणीसाठी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांनी आझाद मैदानात जोरदार धरणे आंदोलन केले.

मागण्या तातडीने मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, शिक्षकांच्या थकीत वेतनाची रक्कम शासनाकडून प्राप्त होऊनही ती शिक्षकांना वितरित करण्यात आलेली नाही. उलट ही रक्कम शासनाकडे परत करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच 'शालार्थ' प्रणालीतील अनेक प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित ठेवली जात असल्याने अनेक शिक्षक वेतनापासून वंचित राहत आहेत.


या सर्व पार्श्वभूमीवर राजेश कंकाळ यांना तातडीने पदावरून हटवावे, ही प्रमुख मागणी आंदोलनकर्त्यांनी केली आहे. याशिवाय प्रलंबित वेतन त्वरित देणे आणि शालार्थ प्रकरणे मार्गी लावणे, अशा इतर मागण्यांचाही यात समावेश आहे. या मागण्यांची पूर्तता करण्यासाठी शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्याकडे निवेदन देण्यात आले असून, लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

# प्रसिद्ध फ्रेंच अभिनेत्री नादिया फारेस यांचे निधन

■ पॅरिस

**फ्रेंच** अभिनेत्री नादिया फारेस स्विमिंग पुलमध्ये पोहत असता हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्या ५७ वर्षांच्या होत्या. द क्रिमसन रिव्हर आणि वार या चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या होत्या. पॅरिसच्या माँटमार्ट्रे परिसरातील एका उच्चभ्रू क्लबमध्ये ११ एप्रिल रोजी ही घटना घडली. तेव्हापासून त्या कोमामध्ये होत्या. शुक्रवारी त्यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात सिलिया आणि शाना चासमन या दोन मुली आहेत. त्यांनीच आपल्या आईच्या निधनाचे वृत्त दिले. फ्रान्सने एक महान कलाकार गमावला,पण आमच्यासाठी मात्र सर्वात महत्वाची बाब म्हणजे आम्ही आमची आई गमावली, असे नादिया यांच्या मुलींनी सोशल मिडिया पोस्टमध्ये म्हटले आहे.

# गोरेगाव पत्रा चाळ रहिवाशांना सदनिका स्वीकारण्यासाठी ३० एप्रिलची मुदत



■ मुंबई

**मुंबईच्या** पश्चिम उपनगरांतील गोरेगाव पश्चिमेकडील सिद्धार्थ नगरच्या (पत्रा चाळ)उर्वरित ३३ रहिवाशांना पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतींमधील सदनिका स्वीकारण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाने ३० एप्रिलची अंतिम मुदत दिली आहे. या मुदतीत जर भाडेकरुंनी सदनिकांचा ताबा घेतला नाही तर या सदनिका अन्य कामांसाठी वापरण्याची परवानगी न्यायालयाने महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरणाला (म्हाडा) दिली आहे.

न्या. गिरीश कुलकर्णी आणि न्या. आरती साठे यांच्या संयुक्त खंडपीठासमोर यासंबंधीच्या याचिकेवर सुनावणी झाली. त्याप्रसंगी मुंबईसारख्या महानगरांत जिथे घरांची उपलब्धता मागणीहून कितीतरी पट कमी आहे तिथे काही भाडेकरुंच्या असहकाराच्या धोरणामुळे घरे वापराविना ठेवणे योग्य नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. पत्रा चाळीतील जे रहिवासी सदनिका ताब्यात घेण्यास तयार नाहीत त्यांना घरांची तातडीची गरज नाही, असे मानले जाईल आणि ती घरे अन्य ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांना किंवा सरकारी कर्मचाऱ्यांना देण्यास म्हाडाला परवानगी असेल, असे निर्देश न्यायालयाने दिले. त्याचवेळी भाडेकरुंना सदनिकांचा ताबा घेणे सुलभ व्हावे यासाठी पत्रा चाळ येथे सकाळी साडेदहा ते सायंकाळी साडे पाच या वेळेत म्हाडाने अधिकारी उपलब्ध करून द्यावेत, असे निर्देश न्यायालयाने म्हाडाला दिले.

# राजेंद्र केरकर यांना स्व. नारायण आठवले स्मृती पुरस्कार जाहीर

■ पणजी

**लोकविश्वास** प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा स्व. नारायण आठवले स्मृती पत्रकारिता पुरस्कार २०२६ यंदा ज्येष्ठ स्तंभलेखक आणि पर्यावरण चळवळीतील सक्रीय कार्यकर्ते राजेंद्र पांडुरंग केरकर यांना जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार समारंभ २८ एप्रिल रोजी सायंकाळी ५.३० वाजता कला अकादमी येथील ब्लॅक बॉक्स सभागृहात होणार आहे. यापूर्वी सायंकाळी ५ ते ५.३० या वेळेत चहापान कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी मुंबई उच्च न्यायालय (गोवा खंडपीठ) न्यायमूर्ती वाल्मिकी मिनेझीस असतील. तसेच गोवा राज्य जैवविविधता मंडळाचे सदस्य सचिव प्रदीप सरमोकदम हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेचे अध्यक्ष अनूप प्रियोळकर आणि सचिव सविता देसाई यांनी केले आहे.

# मुकेश अंबानींना मागे टाकत अदानी पुन्हा आशियात अव्वल

■ मुंबई

**अदानी** समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांनी पुन्हा एकदा आशियातील सर्वात श्रीमंत व्यक्तीचा मान पटकावला आहे. त्यांनी मुकेश अंबानी यांना मागे टाकत हा टप्पा गाठला. 'ब्लूमबर्ग बिलियनेअर्स इंडेक्स'नुसार अदानी यांची एकूण संपत्ती ९२.६ अब्ज डॉलर (सुमारे ७.७ लाख कोटी रुपये) इतकी झाली आहे.

यावर्षात अदानी यांच्या संपत्तीत ८.१० अब्ज डॉलरची वाढ झाली आहे. त्यामुळे जागतिक श्रीमंतांच्या यादीत त्यांनी १९ वे स्थान मिळवले आहे. दुसरीकडे अंबानी यांची संपत्ती ९०.८ अब्ज डॉलर (सुमारे ७.५ लाख कोटी रुपये) असून, या वर्षात त्यांच्या संपत्तीत १६.९ अब्ज डॉलरची घट झाली आहे. ते सध्या जागतिक यादीत २० व्या स्थानावर आहेत. गुरुवारी १६ एप्रिल रोजी शेअर बाजारात किरकोळ घसरण




दिसून आली असली तरी अदानी समूहाच्या शेअर्समध्ये तेजी होती. त्यामुळे अदानी यांच्या संपत्तीत एका दिवसात ३.५६ अब्ज डॉलरची वाढ झाली. त्याचवेळी अंबानी यांच्या संपत्तीत केवळ ७६.७ दशलक्ष डॉलरची वाढ झाली.

दरम्यान, यंदा जागतिक टॉप-२० श्रीमंतांपैकी सात जणांच्या संपत्तीत घट झाली आहे. बर्नार्ड अर्नो यांना सर्वाधिक फटका बसला आहे. त्यांच्या संपत्तीत ४४ अब्ज डॉलरची घट झाली आहे. याशिवाय बिल गेट्स, वॉरेन बफे, लॅरी एलिसन, स्टीव्ह बाल्मर व अमांसिओ ओर्टेगा यांच्याही संपत्तीत घट झाली आहे. जागतिक स्तरावर एलन मस्क ६५६ अब्ज डॉलर संपत्तीसह अव्वलस्थानी आहेत. त्यांच्यानंतर लॅरी पेज (२८६ अब्ज डॉलर) आणि जेफ बेझोस (२६९ अब्ज डॉलर) अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या स्थानावर आहेत. जगातील पहिल्या ५० श्रीमंतांमध्ये अदानी आणि अंबानी हेच दोन भारतीय आहेत.


# भाईंदर जळीतकांड प्रकरणी भूमाफियावर गुन्हा दाखल

■ भाईंदर

**भाईंदरच्या** इंद्रलोक परिसरातील झोपड्यांना लागलेल्या आग प्रकरणात नवघर पोलिसांनी भूमाफिया कमलेश गुप्ता याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या आगीत ३ जणांचा मृत्यू झाला होता.

१० एप्रिल रोजी भाईंदरच्या इंद्रलोक परिसरातील झोपड्यांना आग लागली होती. या आगीत ५० हून अधिक झोपड्या जळून खाक झाल्या होत्या तर दोन लहान मुलांसह तिघांचा मृत्यू झाला होता. कमलेश गुप्ता (४०) या भूमाफियाने या जागेवर झोपड्या बांधून त्या भाड्याने दिल्या होत्या. या झोपड्यांना कुठल्याही प्रकारची आग प्रतिबंधक संरक्षण उपाययोजना केलेली नव्हती. या प्रकरणी नवघर पोलिसांनी कमलेश गुप्ता (४०) याच्या विरोधात निष्काळजीपणे मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या जागेवर कांदळवन क्षेत्राचा ऱ्हास व अनधिकृत भरणी करण्यात आली होती.

# नवाकाळ शब्दकोडे-१५८०



**आडवे शब्द –**

२. अन्न न मिळण्याची स्थिती ६. चण, अंगयष्टी ९. आकर्षक १२. मनोहर १४. नुकताच आलेला १६. धाकटी बहीण १८. आजार १९. बी बियाणे २०. पहिलवान २१. शिखर २३. थांगपत्ता २५. टोचणी २६. मागणी, फर्माईश २८. नमन ३१. सडेतोड ३२. घटना ३४. पूर्ण पोशाख ३५. रंक ३८. कंबरेला खोचण्याचा बटवा ४०. गादी, शय्या ४१. दिवा ४२. महाभारतातील माद्रीची मुले ४७. प्रदेशांपुरते मर्यादित, फक्त त्या प्रदेशाचे ४९. डळमळीत ५०. माफी ५३. ज्ञाती ५४. अर्चना ५७. बादशहासारखी आणखी एक उपाधी ६०. महाभारतात युद्धाच्या प्रसंगी श्रीकृष्णाने अर्जुनाला केलेला उपदेश ६२. हुशारी ६५. जीत ६६. निवृत्तीचे वय ६७. शस्त्रक्रिया ६९. भीती ७१. वचक, दरारा ७३. केस ७४. मिठी ७५. अग्नी ७७. वार्ताहर ८०. खालचा भाग, तळ ८१. दत्ताची तोंडे ८२. असे असले तरी ८४. मेंदू ८५. नाकाचा अर्धा भाग ८७. वाकडा, बाकदार ८८. हत्तीचे पिल्लू ९०. चक्र ९१. कायदेशीर ९५. डाक ९७. अदल घडवणे ९९. सांगितले जाणारे, ऐकीव १०१. गळ्यापर्यंत १०२. कलेवर १०३. कूर्म १०५. पळून जाणे १०६. श्रावणी शुक्रवारी लेकुरवाळ्या स्त्रियांनी या देवतेची पूजा करण्याची प्रथा आहे १०७. सरकारी अधिकारी १०८. तंबाखूसेवनाचा एक प्रकार १०९. सिद्धता


**उभे शब्द –**

१. भारताच्या पश्चिमेचा समुद्र २. कमतरता असलेली, कमी ३. नियमभंग ४. आदर ५. भरड कणीदार पीठ ६. अखेर ७. यकृताचा गंभीर रोग ८. मारुती १०. लोभ ११. केव्हा १३. प्रवासातला टप्पा १५. आरडाओरडा १७. झोपमोड २२. अभिरूचीहीन २४. गाडून टाकणे २६. पकडणे, कैद २७. तोटा २९. श्वसनमार्गाचा दुर्धर आजार, अस्थमा ३०. खात्री ३३. संशय ३६. नेटका ३७. सरिता ३९. चारित्र्य ४०. साडीच्या पदराचे टोक, फरसाणातील चिवड्याबरोबरचा घटक ४२. पंक्तीप्रपंच, भेदभाव ४४. देह, जुन्या पद्धतीचा कानातील अलंकार ४५. सांप्रत ४६. मंदिर ४८. जाणत्या वयाचा ४९. ज्याला कोणी शत्रू नाही असा ५१. महिना ५२. हंगाम, बहराचा कालावधी ५५. नृत्य ५६. धागा ५८. चिलट ५९. विज्ञानशाखेतील महत्वाचा विषय- xxxx शास्त्र ६१. प्रामाणिक ६३. हीन ६४. लिंबाची मोठ्या आकाराची जात ६८. धोकादायक ७०. चिकार ७२. कधीही (नाही) ७३. दुधापासून बनवलेला बेळगावचा प्रसिद्ध पदार्थ ७५. निरंतर, सतत ७६. वाईट सवय ७७. मंडई, हाट ७८. लवण ७९. शिपायाचा तुच्छतेने उल्लेख ८३. आश्रय ८४. भित्रा ८६. विहिरीतून रहाटाने पाणी काढण्याची ८९. भ्रमंती ९०. प्रथा ९१. कसदार ९२. नवविवाहिता ९३. अजाणता ९४. कृषीवल, धान्य पिकवणारा ९६. मागची बाजू ९७. शुभ्र ९८. पारध १००. खोटे विधान १०१. आवेश १०२. शांतवन १०४. पक्ष्याचे घरटे •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५७९ चे उत्तर**

**आडवे शब्द** : १. सकाम ४. फटका ७. विघ्नसंतोषी ११. मुरलीधर १३. वनिता १५. तड १६. फुलका १७. नमकहराम २०. वानवा २२. गावकरी २५. धुमारा २७. रूढी २८. लट ३०. हुलकावणी ३१. तारक ३२. पाणी ३३. वय ३४. कौल ३५. नस ३६. डहाळी ३७. डोसा ३९. कपोत ४०. तग ४१. चहा ४२. वसा ४४. वडवानल ४६. गोऱ्हा ४७. कवडसा ४९. जलसा ५०. जम ५१. जाणकार ५४. सून ५६. लेकरू ५८. वजनदार ६१. क्षालन ६३. चेला ६४. दरारा ६६. यजमान ६८. भारी ७०. कबाब ७१. पात ७२. वरण ७३. चाळ ७४. तर्जनी ७६. पाटव ७७. नेढे ७९. लीप ८०. राग ८१. राबता ८३. सुंकले ८५. शिला ८६. तांबडा ८७. बाप ८९. दंभ ९०. खरारा ९२. पड ९४. त्रपा ९५. अंग ९६. जनित्र ९७. बारव ९८. लगत १००. आकाशगंगा १०४. बया १०५. चरवी १०६. राजेशाही १०७. बंगालचा उपसागर

**उभे शब्द** : १. समुद्र २. कार ३. मलीन ४. फरक ५. कापरा ६. पाव ७. वितान ८. संत ९. तोडगा १०. झालरी १२. धमकावणी १४. निवारा १६. फुकट १८. हक्क १९. मधुर २१. वारुणी २३. वलय २४. पालनपोषण २६. माकडहाड २९. हालचाल ३१. तास ३२. पाळीव ३३. वसावसा ३५. नग ३८. नावाजलेला ४०. तऱ्हा ४१. चवड ४३. साज ४५. नमक ४६. गोरज ४८. सासू ४९अ. लगान ५१. जास्वंद ५२. कावराबावरा ५३. कांदा ५५. नक्षा ५७. रूप ५९. नट ५९अ. रयत ६०. जमाव ६२. लय ६३. चेरी ६५. राकट ६७. नरम ६८. भाळ ६९. अर्ज ७१. पाढे ७३. चाप ७४. तगडा ७५. नीरस ७६. पाठिंबा ७७. नेता ७८. ताक ७९. लीला ८०. राव ८२. बच्चा ८३. सुंभ ८४. लेखनिक ८५. शिरा ८६. तांडव ८८. पत्रकार ८९. दंग ९१. रात्र ९२. परवचा ९३. लगबग ९४अ. पाशवी ९५. अंगारा ९९. तयार १००. आच १०१. नशा १०२. लेंगा १०३. तूप




# राशिभविष्य

**रविवार १९/०४/२०२६ ते शनिवार २५/०४/२०२६**

## ● मेष

**या** आठवड्यात संमिश्र ग्रहमान आहे. आठवड्याची सुरुवात चांगली होईल. खर्चावर नियंत्रण ठेवल्यास धनसंचय चांगला होऊ शकतो. जुन्या गुंतवणुकीतून लाभ होईल. नवीन गुंतवणूक मात्र अतिशय सावधगिरीने करा. योग्य नियोजन करून मगच निर्णय घ्या. अति धाडस तसेच नियमाविरुद्ध कृती टाळावी. कुठल्याही आमिषाला बळी पडू नका. स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवा.

कुटुंबामध्ये चांगले वातावरण राहील. मात्र जोडीदाराशी मतभेद टोकाला जाणार नाहीत याची काळजी घ्या. संततीला तुमच्या मार्गदर्शनाचा चांगला उपयोग होईल. घरामध्ये अनावश्यक खरेदी होऊ शकते. पुढाकार घेऊन अलिप्तपणे काही धोरण राबवावे लागेल. कुटुंबाबरोबर सहलीचे योग आहेत. कार्यक्षेत्रामध्ये तुमच्या नेतृत्वगुणाचा कस लागेल. नवीन संधी मिळतील. परंतु कोणावरही अवलंबून राहता येणार नाही. तुमच्या मर्यादाही लक्षात घ्या. आर्थिक नियोजन तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच करावे. व्यावसायिकांना भांडवल उभे करताना अडथळे येतील. भागीदारीतील व्यवसायात फायदा होऊ शकतो. परंतु मतभेदाचे प्रसंग चतुराईने हाताळावे.

**शुभ दिनांक :** १८, २२, २३.

## ● वृषभ

**या** आठवड्यात तुम्हाला चढउतार जाणवतील. सुरुवातीला कार्य करताना मर्यादा जाणवतील. नंतर मात्र व्यक्तिमत्वाचा प्रभाव राहील. स्वभावामध्ये बंडखोरपणा, तापटपणा वाढू शकतो त्यावर नियंत्रण ठेवावे. बोलण्यामध्ये स्पष्टता असली तरी सौम्यपणा ठेवा. आर्थिक लाभाचे प्रमाण वाढेल. खर्च करताना तारतम्य बाळगणे आवश्यक आहे.

घरातील ज्येष्ठांचा प्रभाव वाढेल. तुमचा मौजमजेकडे कल राहील. कामाकडे मात्र दुर्लक्ष करू नका. संततीच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे निर्णय घेतले जातील. त्यामुळे समाधान जाणवेल. जोडीदाराशी सुसंवाद ठेवा. भावंडांचे सुख राहील. मित्रपरिवाराशी थोडा दुरावा निर्माण होणार आहे.

कार्यक्षेत्रामध्ये तुमच्या नवीन कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी चांगले योग आहेत. तुमच्या कल्पना गुप्त ठेवा. नियोजनपूर्वक काम चालू करा. सुरुवातीला प्रगतीची गती कमी वाटली तरीही कामात सातत्य ठेवा. नोकरदारांना नियमाप्रमाणे काम करावे लागेल. वरिष्ठांशी मतभेद वाढू देऊ नका. व्यावसायिकांनी अचानक मिळणाऱ्या संधीसाठी तयार राहावे. आरोग्य चांगले राखण्यासाठी पथ्य पाळावे लागेल.

**शुभ दिनांक :** २०,२१,२५

## ● मिथुन

**संमिश्र** ग्रहमान या आठवड्यात असणार आहे. अनेक आघाड्यांवर लक्ष द्यावे लागणार आहे. त्यामुळे प्रत्येक गोष्ट नियोजनपूर्वकच करा. दुसऱ्यांच्या मदतीची गरज पडेल त्यानुसार तयारी ठेवा. सकारात्मक विचार तुम्हाला बळ देईल. अनपेक्षितरित्या जुनी येणी वसूल होतील. मन स्थिर ठेवून निर्णय घ्यावेत. स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवा. आत्मविश्वास व उत्साह कमी होऊ देऊ नका.

कामानिमित्त तुम्हाला घरापासून लांब जावे लागले तरीही कुटुंबासाठी आवर्जून वेळ काढावा लागेल. काही प्रश्न मार्गी लावण्यासाठी घरातील ज्येष्ठांची मदत होईल. ताणतणाव जाणवेल. जोडीदाराचे सहकार्य राहील. संततीच्या अपेक्षा पूर्ण करताना थोडी तारांबळ उडेल. आत्ता तुम्हाला कामाचा तणाव जाणवत असेल. परंतु संयमाने नियोजनपूर्वक पावले उचला. लवकरच पुढील प्रगतीसाठी सकारात्मक घडामोडी सुरू होतील. आधी केलेल्या कामाचे, कष्टाचे चीज होईल. नोकरदारांना वरिष्ठांच्या सहकार्याने स्वतःला सिद्ध करता येईल. व्यावसायिकांनी धडाडीने निर्णय घ्यावे. जुनी येणी वसूल करता येतील. नवीन भांडवल गुंतवताना सावधगिरी बाळगावी.

**शुभ दिनांक :** १९,२२,२३

## ● कर्क

**काही** पथ्य, नियम पाळल्यास हा आठवडा तुम्हाला चांगला जाईल. तुमच्या प्रयत्नांना, उत्साहाला योग्य दिशा द्यावी. अतिधाडस, अति आत्मविश्वास टाळा. अभ्यासपूर्ण व नियोजन करून पावले उचला. आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होईल. धनसंचय वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. जुनी कर्ज फेडता येतील. कोर्टकचेरीपासून मात्र लांब राहावे. जिद्द व अट्टाहास यातील फरक लक्षात ठेवा.

घरामध्ये उत्साही वातावरण राहील. राग व बोलण्यावर मात्र नियंत्रण ठेवा. अविवाहितांचे विवाह ठरण्याचा योग आहे. प्रेमीजनांची विवाहाची बोलणी सफल होतील. गृहसजावट, नवीन वास्तु वा वाहन खरेदी करू शकाल. कौटुंबिक समस्या सोडविण्यासाठी अलिप्त धोरण ठेवून पुढाकार घ्यावा.

नोकरीव्यवसायात नवीन संधी मिळतील. मात्र शहानिशा करून घ्यावी. भावनेच्या भरात निर्णय घेऊ नका. गुंतवणूक करताना कायदेशीर सल्ला जरूर घ्यावा. नोकरदारांनी वादविवाद टाळून स्वतःच्या कामावर लक्ष केंद्रित करावे. वाहन चालवताना काळजी घ्या. आरोग्याच्या तक्रारींकडे वेळीच लक्ष द्यावे.

**शुभ दिनांक :** १९, २०, २१, २५.

## ● सिंह

**आठवड्याचा** मध्य महत्त्वाच्या कामांसाठी चांगला आहे. तुमच्या प्रयत्नांना भाग्याची साथ चांगली राहील. येणारे अडथळे कमी व्हायला सुरुवात होणार आहे. तुमची क्षमता, कर्तृत्व तुम्हाला सिद्ध करता येईल. अतिआत्मविश्वास मात्र त्रासदायक ठरू शकतो. विरोधकांचा जोर वाढला असला तरीही आता तुम्ही त्यावर नियंत्रण मिळू शकाल. लाभाचे प्रमाण वाढणार असले तरीही आर्थिक बाबतीत सावधगिरीने निर्णय घ्यावेत.

कौटुंबिक आघाडीवर थोडा तणाव जाणवेल. निर्णय घेताना कौटुंबिक सदस्यांचे मत विचारात घ्या. खर्चावर बंधने ठेवावीत. गरज पडल्यास माघार घेऊन कौटुंबिक हिताला प्राधान्य द्या. वडिलांचे सहकार्य, सल्ला महत्त्वाचा ठरेल. भावंडांचे सहकार्य मिळेल. संततीसाठी आवर्जून वेळ काढा. तसेच आधीच्या खर्चाची तयारी ठेवावी.

उद्योग व्यवसायात स्पर्धात्मक परिस्थिती जाणवेल. त्यातून यश मिळवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग आवर्जून करावा. लोकसंग्रहाचा फायदा होईल. मात्र झटपट फायद्यासाठी चुकीची गुंतवणूक होणार नाही याबाबत सावधगिरी बाळगा. नोकरदारांनी संयमाने योग्य संधीची वाट पाहावी. वरिष्ठांचे वर्चस्व मान्य करावे लागेल. भागीदारीतील व्यवसाय असल्यास गैरसमज, वादविवाद टाळल्यास नफा होईल. आरोग्याकडे लक्ष द्यावे.

**शुभ दिनांक :** २०, २१, २२, २३.

## ● कन्या

**आठवड्याचा** उत्तरार्ध महत्त्वाच्या कामासाठी योग्य राहील. भाग्याची साथही तेव्हा मिळणार आहे. सुरुवातीला अडथळे जाणवतील. मनामधील गोंधळ निर्णय घेण्यास त्रासदायक ठरेल. संयम व स्थिर मनाने निर्णय घ्यावे. नैराश्य टाळा. घाईगडबडीत किंवा भावनेच्या भरात निर्णय घेऊ नका. जुनी नाती टिकवून ठेवावी लागतील. आर्थिक स्थिती हळूहळू सुधारेल. गुंतवणुकीसाठी फारसा योग्य काळ नाही.

कुटुंबामध्ये चांगले वातावरण राहण्यासाठी पुढाकार घ्यावा. छोटे समारंभ तसेच सहलीचे आयोजन होईल. मात्र अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवावे लागेल. संतती व जोडीदाराबरोबर मतभेद होऊ शकतात. सुसंवाद ठेवून समन्वय साधावा. भावंड तसेच मित्रपरिवाराबरोबर वेळ घालवाल.

कार्यक्षेत्रामध्ये भागीदारावर, सहकारी वर्गावर अवलंबून राहता येणार नाही. नवीन व्यवहार करताना कायदेशीर बाजू तपासून बघावी. छुपे हितचिंतक कार्यरत होतील. स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी तुमची क्षमता, गुणवत्ता सिद्ध करावी लागेल. त्यामध्ये तुम्हाला यश मिळेल. नोकरदारांनी बढतीसाठी प्रयत्न करावेत. मानसिक व शारीरिक आरोग्याची काळजी घ्यावी.

**शुभ दिनांक :** २२, २३, २५.

## ● तूळ

**आठवड्याची** सुरुवात चांगली होणार आहे. नंतर अडथळे जाणवले तरी आठवड्याची अखेर यश देणारी आहे. जबाबदारी वाढणार आहे. घाईगडबडीत तसेच भावनेच्या भरात निर्णय घेऊ नका. लाभाचे प्रमाण वाढणार आहे. आत्मविश्वासही चांगला राहील. येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी स्वतःवर विश्वास ठेवा मार्ग निश्चित मिळेल. आर्थिक आवक उत्तम असली तरी खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. गुंतवणूक करायची असल्यास तज्ज्ञांच्या सल्ल्याने व दीर्घ मुदतीसाठी करावी.

कौटुंबिक आघाडी सांभाळताना मानसिक तणाव जाणवेल. विशेष प्रयत्न करावे लागतील. जोडीदाराची साथ मिळेल. मुलांशी सुसंवाद ठेवून त्यांच्या समस्या जाणून घ्या. तुमच्याही मनातील शंकांचे अनुभवी व्यक्तीशी चर्चा करून निरसन करा. त्यामुळे योग्य निर्णय घेता येतील.

कार्यक्षेत्रात जुनी अडकलेली कामे पुन्हा सुरू करा. परिस्थितीनुसार तुमची कार्यशैली बदलावी लागेल. अनपेक्षित संकटं आली तरी ठरवलेले ध्येय तुम्ही पूर्ण करू शकाल. हितशत्रूंशी जशास तसे वागणे योग्य ठरेल. नोकरदारांनी वाढलेली जबाबदारी संधी समजून पूर्ण करावी. कर्ज देणेघेणे टाळावे.

**शुभ दिनांक :** १९, २४, २५.

## ● वृश्चिक

**तुमची** महत्त्वाची कामे आठवड्याच्या पूर्वार्धात करून घ्यावी. प्रत्येक आघाडीवर लक्ष द्यावे लागल्यामुळे मानसिक ताण वाढणार आहे. आत्मविश्वासाने अडथळे पार करा. आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका. परस्परविरोधी विचारांची मनात गर्दी होईल. सारासार विवेक बुद्धीने निर्णय घेऊन योग्य दिशेने प्रयत्न करा. आर्थिक नियोजन करताना तारांबळ उडाली तरीही गोष्टी पूर्ण करता येतील.

कार्यक्षेत्र व कुटुंब दोन्हीकडे लक्ष द्यावे लागल्यामुळे धावपळ वाढणार आहे. स्थिर मनाने व संयम ठेवून परिस्थिती हाताळण्यास प्राधान्य द्यावे. जोडीदाराचे सहकार्य राहील. परंतु त्याचे वर्चस्व स्वीकारा. संततीबाबत थोडी चिंता राहील. समस्या नीट जाणून घेऊन त्यावर उपाय करा. भावंडांचे सहकार्य मिळेल. कुटुंबामध्ये दुरावा टाळण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील.

कार्यक्षेत्रामध्ये चढउतार जाणवतील. कुठल्याही आमिषाला बळी पडू नका. भागीदारीतील व्यावसायिकांना सामंजस्याने व्यवहार करावे लागतील. सुसंवाद ठेवा. नोकरदारांना नोकरीत बदल करायचा असल्यास योग्य काळ आहे. नियोजित कामे वेळच्यावेळी पूर्ण होतील याकडे लक्ष द्यावे.

**शुभ दिनांक :** १९, २०, २१.

## ● धनु

आठवड्याची सुरुवात उत्साही राहणार नाही. नंतर कामाचा वेग वाढेल. काही मनासारख्या घटना घडल्यामुळे तुमचा उत्साह वाढेल. चांगले मनस्वास्थ्य मात्र टिकवून ठेवा. अनपेक्षित अडथळ्यांबरोबरच अनपेक्षित संधीही मिळू शकते. आत्मविश्वास चांगला राहील. आर्थिक स्थितीमध्ये चढउतार जाणवतील. नवीन योजनांमध्ये सध्या गुंतवणूक टाळावी. पैसा अडकून पडणार नाही, फसवणूक होणार नाही यासाठी सावधगिरी बाळगा.

कुटुंबामध्ये अनेक घडामोडी घडू शकतात. तुमचा आत्मविश्वास चांगला असला तरी गृहसौख्य टिकवून ठेवण्यासाठी सर्वांशी सुसंवाद ठेवून निर्णय घ्यावेत. कौटुंबिक व्यवसायात यश मिळेल. घरातील ज्येष्ठांच्या, आईच्या आरोग्याची काळजी घ्यावी. जोडीदाराशी विसंवाद टाळावा. संततीच्या दृष्टीने भाग्यकारक घटना घडेल.

कार्यक्षेत्रामध्ये तुमची प्रतिमा, प्रतिष्ठा सांभाळा. स्वीकारलेली जबाबदारी पूर्ण करताना अतिशय धावपळ करावी लागेल. स्पर्धा व हितशत्रू यांना तोंड द्यावे लागेल. नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग फायदेशीर ठरेल. भागीदार, वरिष्ठ यांच्या मनामध्ये गैरसमज होणार नाही यासाठी सावध राहा. आरोग्य चांगले राखण्यासाठी पथ्य पाळावे.

**शुभ दिनांक :** २०, २१, २२, २३.

## ● मकर

राशीस्वामी शनीचा उदय झाल्यामुळे तुमची अडकलेली कामे मार्गी लागतील. आठवड्याचा उत्तरार्ध महत्त्वाच्या कामांसाठी चांगला ठरेल. धावपळ मात्र वाढणार आहे. कामांचा प्राधान्यक्रम ठरवून त्यावरच लक्ष केंद्रित करा. मिळणारी नवीन संधी स्वीकारावी. त्यामुळे तुमची क्षमता सिद्ध होईल. आर्थिक लाभ चांगले होतील. बचतीकडे मात्र आवर्जून लक्ष द्यावे.

घरामध्ये अचानक खर्च निघू शकतात. घरातील ज्येष्ठांचे प्रश्न त्रासदायक ठरतील. कामानिमित्त प्रवास करावा लागेल. त्यामुळे कुटुंबाकडे दुर्लक्ष होऊ शकते. भावंडांशी जमवून घ्यावे लागेल. मुलांची प्रगती समाधानकारक राहील. जोडीदाराला गृहीत न धरता त्याच्याशी सुसंवाद ठेवा.

कार्यक्षेत्रामध्ये अनेक जबाबदाऱ्या वाढणार आहेत. तुम्ही त्या योग्य तऱ्हेने पूर्ण केल्यामुळे तुमच्या प्रतिष्ठेत भर पडेल. स्पर्धक व हितशत्रू यांच्याशी वादविवाद न करता तुमचे धोरण ठरवा. शत्रूंवर मात करून स्वतःचे कौशल्य सिद्ध करू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांची मर्जी सांभाळावी.

आरोग्याच्या तक्रारी दुर्लक्षित करू नका. वेळीच उपाययोजना करावी.

**शुभ दिनांक :** २२, २३, २५.

## ● कुंभ

**आठवड्याची** सुरुवात धावपळीने होईल. आठवड्याच्या अखेरीला तुमच्या कष्टाचे फळ तुम्हाला मिळेल. राशीस्वामी शनीचा उदय झाल्यामुळे तुम्हाला जाणवणाऱ्या मर्यादा कमी होतील. साडेसाती असली तरी सकारात्मक विचार तुम्हाला बळ देतील. कितीही अडथळे, अडचणी नियोजित कामात आल्या तरीही शांत व स्थिर मनाने निर्णय घेतल्यास यश मिळेल. तुमच्या प्रयत्नांना भाग्याची साथ आहे. आर्थिक कोंडी टाळण्यासाठी तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. कुठल्याही त्वरित लाभाच्या अमिषाला बळी पडू नका.

घरामध्ये संमिश्र वातावरण राहील. छोटे छोटे समारंभ साजरे होतील. जोडीदाराचा सल्ला, अनुभव मार्गदर्शक ठरेल. संततीचे कर्तृत्व समाधान देईल. त्यासाठी तुमचे पाठबळ महत्त्वाचे ठरेल. भावंडांचे सौख्य राहील.

कार्यक्षेत्रामध्ये विरोधकांच्या कारवाया त्रासदायक ठरल्या तरी तुम्ही त्यावर नियंत्रण ठेवाल. तुमच्या योजना, धोरण गुप्त ठेवा. व्यावसायिक भांडवल उभे करता नवीन गुंतवणूक टाळा. नोकरदारांना मात्र सावधगिरीने कृती करावी लागेल. वरिष्ठांची साथ मिळणार आहे.

**शुभ दिनांक :** १९, २४, २५.

## ● मीन

**आठवडा** तुमच्या संयमाची परीक्षा पाहणारा ठरेल. स्थिर मनाने परिस्थिती हाताळावी लागेल. भावनेचा गुंता निर्णय घेण्यास उशीर करेल. शक्य असल्यास अनुभवी व्यक्तीचा सल्ला घ्यावा. नैराश्य व आक्रमकता दोन्हीवर नियंत्रण ठेवा. आर्थिक स्थिती चांगली राहणार आहे. मात्र आर्थिक व्यवहार करताना अनुभवी तज्ञाचा सल्ला जरूर घ्यावा.

कौटुंबिक जबाबदारी वाढणार आहे. ती तुम्ही पूर्ण करू शकाल. बोलताना काळजी घ्यावी. स्पष्ट परंतु सौम्य शब्दात म्हणणे मांडा. अनावश्यक खर्च अचानक उभे राहतील. कौटुंबिक प्रगतीसाठी वेळप्रसंगी कठोर निर्णय घ्यावे लागतील. भावंडांचे सहकार्य मिळेल. मित्रपरिवाराला मदत करावी लागेल.

कार्यक्षेत्रामध्ये विरोधकांच्या कारवाया वाढतील. परिस्थितीनुसार धोरण, कार्यशैलीतील बदल उपयोगी राहील. नवीन जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी स्वतःच्या क्षमतेचा, मर्यादेचा जरूर विचार करा. नियोजित कार्य पूर्ण करण्यासाठी कामाची गती वाढवावी लागेल. योग्य ठिकाणी धाडस दाखवणे फायद्याचे ठरेल.

आरोग्य सांभाळा. वाहन चालवताना काळजी घ्या.

शुभ दिनांक : २०, २१.

**- ज्योतिषपंडित-प्रज्ञा धनंजय, पुणे**

नवाकाळ

• मुंबई | रविवार १९ एप्रिल, २०२६ • पान -८

# स्मार्टफोनवर आधार ॲप अनिवार्य न करण्याचा निर्णय



**नवी दिल्ली -** केंद्र सरकारने ॲपल, सॅमसंग आणि इतर कंपन्यांना त्यांच्या स्मार्टफोनमध्ये 'आधार' ॲप प्री इन्स्टॉल करण्याची सक्ती करण्याच्या प्रस्तावावर पुढे पाऊल न टाकण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या स्मार्टफोनमध्ये आधार ॲप इनबिल्ट करणे अनिवार्य असणार नाही. त्यामुळे मोबाईल कंपन्यांना दिलासा मिळणार आहे.

युनिक आयडेंटिफिकेशन ऑथोरिटी ऑफ इंडियाने जानेवारीत माहिती व तंत्रज्ञान मंत्रालयाला ॲपल, सॅमसंग आणि इतर स्मार्टफोन उत्पादकांशी संपर्क साधून आधार ॲपचे अनिवार्य पूर्व-इन्स्टॉलेशन करण्याबाबत विचार करण्यास सांगितले होते. माहिती व तंत्रज्ञान मंत्रालयाने या प्रस्तावाचा आढावा घेतला असून आपण स्मार्टफोनवर आधार ॲप अनिवार्यपणे पूर्व-इन्स्टॉल करण्याच्या बाजूने नाही, असे युनिक आयडेंटिफिकेशन ऑथोरिटी ऑफ इंडियाने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

**एनडीटीव्हीचा पत्रकार प्रणय रॉय! मी या प्रणय रॉयला गेले चाळीस वर्षांहून अधिक काळ पाहत आलोय. त्या काळात ब्लॅक आणि व्हाईट टीव्ही असायचे आणि हा पोरसवदा वाटणारा तरुण अगदी शांतपणे प्रसन्न मुद्रेत निवडणुकांचे कल किंवा निवडणुकांचे विश्लेषण करण्यासाठी यायचा. निकाल अचंबित करणारे आले तरी तो आजकालच्या आक्रस्ताळी भाषेत सांगण्याऐवजी शांतपणे त्याच्या तालात किंवा ठुमरीत जसा मंद ताल असतो तशा पद्धतीने सांगायचा. जमाना वाजपेयी, अडवाणी आणि मनमोहन सिंग यांच्यासारख्या शांत, सज्जन आणि मवाळ लोकांचा होता. कोणताही नेता दुसऱ्या नेत्यांची उगाचच खोटे आरोप करून चमडी लोलवणारी भाषा करत नसे. प्रवक्ता नावाचा चमकोगिरी प्रकारही नव्हता.**



# प्रणय रॉय!!



**सुनील घोडके**

**तो**वर राजकारण अब्बुदार लोकांचा खेळ होता. असो.. पण या प्रणय रॉय नावाच्या एका तरुण माणसाने आम्हाला राजकारण ऐकायला, बघायला शिकवले. पण एकदा राजकारण बघणे नावाची इंगळी डसली की तिला उतारा नाही. कारण तुम्ही बातम्या ऐकता ऐकता कधी त्यात गुंतले जाता तेच कळत नाही.

येत्या आठवड्यात पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू राज्यात मतदान होत आहे. आणि काल पुन्हा मी याच प्रणय रॉयला पश्चिम बंगालमध्ये मुलाखत घेताना पाहिले अन् मला धक्काच बसला.

कोणता असला हा राजकारणाचा कीडा असतो यांना की हे राजकारणाशिवाय स्वस्थच बसू शकत नाहीत. कारण हा नुसता सत्तेचा सारीपाट नसतो तर लोकांच्या मनात चाललेली सत्ताधाऱ्यांच्याप्रती असलेला द्वेष अथवा आदर यांची चाचपणी करणे आणि राजकीयदृष्ट्या आणि मानसिक दृष्ट्या त्यांना आजमावून बघणे असते

भारताला स्वातंत्र्य मिळून पंचाहत्तरहून अधिक वर्षे झाली. रोज भारतात कुठे ना कुठे निवडणुका होतच राहतात. रोज कुणी ना कुणी पत्रकार जणू साऱ्या जगावर अणुबॉम्ब पडलाय अशा थाटात आगलावी पत्रकारिता करत असताना प्रणय रॉयची पत्रकारिता देव्हाऱ्यातल्या मंद निरंजनासारखी शांतपणे तेवत आहे.

आमच्यासारखे काही राजकारणात कमालीचा रस असणारे जे थोडेफार दर्दी झाले त्या सर्व आमच्यासारख्या पत्रकारांचे दूरस्थ गुरू असेच कुणीतरी म्हणजे प्रणय रॉय सारखेच आहेत..

काल पुन्हा प्रणय रॉय यास माईक आणि मोबाईल घेवून पाहिले अन् मनातल्या मनात त्यांच्या समर्पणास नमस्कार केला. मला वाटले की, अशा देखण्या, राजबिंड्या, गोऱ्यापान माणसांना देव का असे जराजर्जर अन् वृद्ध करत असतो.

यांना नुसते बघून आमच्यासारखी एक पिढी घडत असते..!

हा नुसताच जन जागरणाचा छंद नाही तर हॉबी नाही तर ही फॅशन आहे!

# कोकण रेल्वेत परप्रांतीयांची मुजोरी

■ रत्नागिरी

**रत्नागिरी** रेल्वे स्थानकात एक धक्कादायक प्रकार घडला असून कन्फर्म तिकीट असूनही एका प्रवाशाला वास्को-द-गामा ते पाटणा एक्स्प्रेसमध्ये चढू दिले नाही.

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, संपूर्ण डबा अवैध प्रवाशांनी व्यापलेला होता, त्यामुळे कन्फर्म तिकीट असूनही मला आत प्रवेशच मिळू शकला नाही. या प्रकारामुळे रेल्वे प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. 'तिकीट काढूनही प्रवास करता येत नसेल, तर त्याला जबाबदार कोण? असा सवाल उपस्थित केला जात आहे. या घटनेनंतर रेल्वे प्रशासनाच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ड्युटीवरील टीसीने योग्य कारवाई केली का, याबाबत चौकशी करण्याची मागणीही जोर धरत आहे.

प्रवाशांच्या सुरक्षिततेचा आणि हक्कांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून अशा घटनांवर आळा घालण्यासाठी रेल्वे प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

# महिला आरक्षण विधेयकाला प्रियंका चतुर्वेदीचे समर्थन

**उबाठात मतभेद उघड**

■ मुंबई

**महिला** आरक्षणासंदर्भातील १३१ व्या घटनादुरुस्ती विधेयकावरून देशाच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. संसदेत आवश्यक दोन तृतीयांश बहुमत न मिळाल्याने हे विधेयक नामंजूर झाले. विधेयकाच्या बाजूने २९८ तर विरोधात २३० मते पडली. त्यामुळे राष्ट्रीय लोकशाही आघाडीला मोठा धक्का बसला आहे. मात्र या विधेयकावरून उबाठातील अंतर्गत मतभेद उघड झाले आहेत.

विधेयकावर ठाकरे गटाच्या खासदारांनी विरोधात भूमिका

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

घेतली. मात्र, माजी राज्यसभा खासदार प्रियंका चतुर्वेदी यांनी पक्षाच्या भूमिकेला डावलत या विधेयकाचे उघड समर्थन केले. विधेयक मंजूर न होणे हा भारतीय लोकशाहीसाठी दुःखद दिवस असल्याचे आणि संसदेत आणि विधानसभेत प्रवेश करू इच्छिणाऱ्या महिलांसाठी ही मोठी निराशा असल्याचेही त्यांनी म्हटले. आपली भूमिका अधिक ठाम करताना प्रियंका चतुर्वेदी म्हणाल्या की, महिला आरक्षणाच्या मुद्याचे मी सातत्याने समर्थन करत राहणार आहे. मी स्वतःला इतरांच्या सोयीनुसार बदलणार नाही. माझी भूमिका कोणाला मान्य नसेल, तर तो त्यांचा प्रश्न आहे.

# मुंबईत आज लोकलच्या तिन्ही मार्गांवर मेगाब्लॉक



■ मुंबई

**विविध** अभियांत्रिकी आणि देखभाल कामांसाठी उद्या लोकल रेल्वेच्या तिन्ही मार्गांवर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे. त्यामुळे प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागणार आहे.

मध्य रेल्वेकडून हार्बर आणि ट्रान्स हार्बर मार्गावर ब्लॉक घेण्यात येणार आहे. हार्बर मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) ते पनवेल/बेलापूर दरम्यान सकाळी ९.४५ ते दुपारी ३.१२ या वेळेत डाऊन सेवा रद्द राहतील, तर पनवेलहून सीएसएमटीकडे येणाऱ्या अप सेवा सकाळी १०.३३ ते दुपारी ३.४९ दरम्यान बंद राहतील. प्रवाशांची गैरसोय कमी करण्यासाठी सीएसएमटी ते वाशी दरम्यान काही विशेष लोकल चालवण्यात येणार असल्या, तरी पनवेलकडे जाणाऱ्या प्रवाशांना फटका बसण्याची शक्यता आहे.

ट्रान्स हार्बर मार्गावरही पनवेल ते ठाणे आणि ठाणे ते पनवेल दरम्यानची वाहतूक काही तास पूर्णपणे बंद राहणार आहे. पनवेलहून ठाण्याकडे सकाळी ११.०२ ते दुपारी ३.५३ आणि ठाण्याहून पनवेलकडे सकाळी १०.०१ ते दुपारी ३.२० या वेळेत सेवा बंद असेल. पश्चिम रेल्वेवर सांताक्रूझ ते गोरेगाव दरम्यान अप आणि डाऊन जलद मार्गावर सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत पाच तासांचा जम्बो ब्लॉक घेण्यात येणार आहे.

# मी ॲक्सिसमध्ये असताना अशा गोष्टी घडल्या होत्या

■ मुंबई

**नाशिकच्या** टाटा कन्सल्टंट सर्व्हिसमध्ये घडलेल्या धर्मांतर आणि लैंगिक छळाच्या घटनांवर आज मुख्यमंत्री फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी

**अमृता फडणवीसांचे वक्तव्य**

माध्यमांशी संवाद साधताना म्हटले की, मी ॲक्सिस बँकेत असताना माझ्यासमोरही धर्मांतर, महिलांचे लैंगिक शोषण असे प्रकार घडले होते, पण त्यावर लगेच कारवाई करण्यात आली असे खळबळजनक विधान केले.

अमृता फडणवीस पुढे म्हणाल्या की, टिसीएस प्रकरणावरून कॉर्पोरेट जगतात जे काही घडते आहे ते खेदजनक आहे, असे प्रकार मुळीच खपवून घेता कामा नये.

मी ॲक्सिस बँकेत असताना माझ्यासमोरही धर्मांतर आणि वरिष्ठ पदांवर असलेल्या पुरुष पदाधिकाऱ्यांकडून महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषणाचा प्रयत्न झाल्याच्या घटना आल्या. मात्र त्यावेळी आम्ही तत्काळ त्याची दखल घेत योग्य ती कारवाई करण्यात आल्याने पुढील अनर्थ टळला.

# कच्छी मेमन समाज आता राजकारणामध्ये उतरणार

■ मुंबई

**व्यापारी** समाज अशी ओळख असलेला कच्छी मेमन समाजही आता राजकारणात उतरणार आहे. आपल्या समाजाला सत्तेच्या वर्तुळात हक्काचा वाटा मिळावा यासाठी समाजातील जाणत्या लोकांनी पुढे येऊन कच्छी मेमन पॉलिटिकल अँड सोशल जस्टीस फोरम नावाने एक मंच स्थापन केला आहे.

कित्येक वर्षांपासून कच्छ मेमन समाज हा व्यापार-उद्योग आणि फारसा गाजावाजा न करता सामाजिक कार्यात देण्या देत आला आहे. समाजातील जाणकारांचे म्हणणे आहे की, समाज आर्थिकदृष्ट्या उच्च स्तरावर आहे. मात्र राजकीय आघाडीवर समाजाची एकजूट नाही. त्यामुळे समाजाला देशाच्या राजकारणात फारसे प्रतिनिधित्व मिळत नाही. १० एप्रिल हा कच्छी मेमन दिन म्हणून साजरा केला जातो. यंदा या दिनाचे औचित्य साधून फोरमची स्थापना करण्यात आली.

# पुणे विमानतळ ठप्प! रात्रभर प्रवासी ताटकळले

■ पुणे

**पुणे** आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे भारतीय वायुसेनेच्या विमानाने केलेल्या हार्ड लँडिंगनंतर धावपट्टी (रनवे) तात्पुरती बंद करण्यात आल्याने विमान वाहतूक तब्बल ८ तास ठप्प झाली. या घटनेमुळे शेकडो प्रवाशांना रात्रभर विमानतळावरच ताटकळत बसावे लागले.

या घटनेमुळे अनेक उड्डाणे रद्द करण्यात आली. त्यामध्ये इंडिगोची ६५, एअर इंडियाची ६, स्पाइसजेटची ५, अकासा एअरची ५ आणि एअर इंडिया एक्स्प्रेसच्या १० उड्डाणांचा समावेश होता. त्यामुळे विमानतळावर मोठ्या प्रमाणात प्रवाशांची गर्दी उसळली होती. अनेक प्रवासी रात्रीपासून विमानतळावर अडकून पडले होते. काहींना बसण्यासाठी जागाही मिळत नव्हती, तर पाणी आणि इतर मूलभूत सुविधांचा अभाव जाणवत होता. नांदेडहून आलेल्या काही प्रवाशांनी सांगितले की, आम्ही रात्री १० वाजल्यापासून विमानतळावर आहोत. आमचे विमान रद्द झाले, पण विमानतळ प्रशासनाकडून कोणतीही ठोस माहिती किंवा मदत



मिळाली नाही. आम्हाला बसायलाही जागा नाही. काही प्रवाशांनी एरो मॉल येथे रात्र काढल्याचे सांगितले. विमानतळ प्रशासनाकडून केवळ फ्लाईट रद्द झाल्याची माहिती देण्यात येत आहे.

# अमोल खुणेंचे जरांगेंना 'कडेलोट'चे आव्हान

■ मुंबई

**मराठा** आरक्षणासाठी लढणारे मनोज जरांगे-पाटील यांनी ज्याच्यावर आपली सुपारी घेतल्याचा आरोप केला त्या अमोल खुणे यांनी जरांगेंना प्रत्युत्तर दिले. मी जर सुपारी घेतली असेल तर माझा रायगडच्या टकमक टोकावरून कडेलोट करा. मात्र मी जर निर्दोष सुटलो तर जरांगेंचा कडेलोट करा, असे आव्हान खुणे यांनी जरांगेंना दिले.

जरांगे यांनी जो माझ्यावर त्यांची सुपारी घेतल्याचा आरोप केला आहे तो धादांत खोटा आहे. जरांगेंनी बोलताना जरा तोंड सांभाळून बोलावे. मी त्यांची हत्या करण्याची सुपारी घेतली, असे जरांगे म्हणतात. माझी पैदास विचारतात. मी जर त्यांच्यासारखा खालच्या पातळीवर उतरलो तर जरांगेंना समाजात तोंड दाखवायला जागा राहणार नाही, असे

# आणखी एक भोंदूबाबा अटकेत दैवी शक्तीच्या नावाखाली लूट

■ अहमदनगर

**मंत्रशक्तीने** कॅन्सरसारखे आजार बरे करतो, अशी खोटी बतावणी करून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या संगमनेर तालुक्यातील वडगावपान येथील भोंदूबाबा राजेंद्र गडगे याला पोलिसांनी अटक केली आहे. दत्तधाम सरकारच्या नावाने दरबार भरवून तो गेल्या अनेक वर्षांपासून भोळ्या-भाबड्या लोकांची आर्थिक व मानसिक लूट केल्याचा त्याच्यावर आरोप आहे.

राजेंद्र गडगे यूट्यूब चॅनलद्वारेही बनावट व्हिडिओ प्रसारित करत लोकांची दिशाभूल करत होता. समस्या सोडवण्याच्या नावाखाली तो भक्तांकडून १५ ते ५१ हजार रुपयांपर्यंत रक्कम उकळत होता. त्याने आजारांवर उपचार करण्याच्या बहाण्याने दिलेल्या औषधांमुळे अनेकांना त्रास झाल्याचेही उघड झाले आहे. गेल्या दहा वर्षांपासून सुरू असलेल्या या प्रकारामुळे अनेक कुटुंबांचे आर्थिक आणि मानसिक शोषण झाले. या प्रकरणाचा पाठपुरावा अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या ॲड. रंजना गवांदे यांनी केला. या प्रकरणी पोलिसांनी मुख्य आरोपीसह त्याच्या सहकाऱ्यांना अटक केली असून जादूटोणा विरोधी कायदा, ड्रग अँड मॅजिक रेमेडीज ॲक्ट, मेडिकल प्रॅक्टिशनर ॲक्ट आणि आयटी ॲक्ट अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत.

# सहकाराच्या विद्यापीठासाठी अभ्यासात्मक निर्णय घेऊ उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे प्रतिपादन

■ पुणे

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांनी केंद्रात नव्याने सहकाराचे खाते निर्माण केले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे सहकार विभागाचा कारभार सोपविण्यात आला. शहा यांनी अगोदरच सहकाराचे एक विद्यापीठ घोषित केले. त्या विद्यापीठात अनेकजण कोर्सेस करण्यास जाऊ शकतात. पण महाराष्ट्रात असे विद्यापीठ हवे असेल तर वैकुंठभाई मेहता संस्था आहे. असे असतानाही आपण आपले वेगळे विद्यापीठ काढू शकू का? याचा अभ्यास करू, असे



प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

पुण्यातील महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या संचालक मंडळ कार्यालय आणि सहकारी पदाधिकारी परिषदेचे उद्घाटन मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष आ. प्रविण दरेकर होते. याप्रसंगी राज्य सहकारी बँकेचे प्रशासकीय मंडळ अध्यक्ष विद्याधर अनास्कर, सहकार आयुक्त दीपक तावरे, आ. सुनील कांबळे, महाराष्ट्र सहकारी संघाचे ज्येष्ठ संचालक संजीव कुसाळकर, पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, राज्य सहकारी बँकेचे तज्ज्ञ संचालक शिवाजीराव नलावडे, मुंबई बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, संचालक नितीन बनकर, महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे उपाध्यक्ष अर्जुनराव बोबडे » पान २ वर

# म्यानमारच्या माजी राष्ट्राध्यक्ष आंग स्यू ची यांच्या शिक्षेत कपात

■ नेप्यिडॉ

**म्यानमारच्या** लष्कर-समर्थित सरकारने माजी नेत्या आंग सान स्यूची यांच्या तुरुंगवासात यस कपात केली आहे. भ्रष्टाचार, निवडणूक गैरव्यवहार आणि राज्य गुपित कायद्याचे उल्लंघन अशा आरोपांखाली त्या २७ वर्षांची शिक्षा भोगत आहेत. स्यूची यांच्यासह म्यानमारचे माजी राष्ट्राध्यक्ष विन मिंट आणि इतर ४३३५ कैद्यांना शिक्षा माफी मंजूर केली आहे.

स्यूची यांच्या सहकाऱ्यांच्या मते स्यूची यांच्यावर राजकीय हेतूने आरोप करण्यात आले आहेत. त्यांचा शिक्षा काळ आता कमी केल्याने त्यांच्या शिक्षेत सुमारे साडेचार वर्षांची घट झाली असून आता सुमारे साडेबावीस वर्षांची शिक्षा शिल्लक आहे. त्यांना उर्वरित शिक्षा घरी नजरकैदेत भोगावी लागेल का हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. शिक्षा माफीच्या निर्णयानुसार म्यानमारचे माजी राष्ट्राध्यक्ष विन मिंट यांची सुटका करण्यात आली आहे. ते २०२१ च्या लष्करी उठावापासून नजरकैदेत होते. राष्ट्राध्यक्ष मिन आंग ह्लाइंग यांनी ४,३३५ कैद्यांनाही माफी मंजूर केली असून त्यामध्ये १७९ परदेशी नागरिकांचा समावेश आहे.



■ मुंबई

# एनआयएने आरोपीवर १२ वर्षांनी 'टेरर फंडिंग'चा आरोप लावला

**आयसीस** या मुस्लीम दहशतवादी संघटनेचा कथित हस्तक अरीब माजिद याच्यावर राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) तब्बल १२ वर्षे खटला चालल्यानंतर काल नव्याने टेरर फंडिंगचा नवा आरोप लावला.

एनआयएने माजिदवर पाचवे पुरवणी आरोपपत्र दाखल केले. त्यामध्ये माजिदवर भारतीय दंड विधान संहितेच्या कलम १७ (दहशतवादी कृत्यांसाठी पैसा गोळा करणे) अन्वये नवा आरोप ठेवला. हे आरोपपत्र न्यायालयाने दाखल करून घेत त्याची एक प्रत आरोपीला देण्याचे निर्देश एनआयएला दिले. कल्याणचा रहिवासी असलेल्या माजिद, सह-आरोपी फहाद शेख, शाहिम टंकी आणि अमन तांडेल हे सारे आयसीसच्या विचारधारेने प्रभावित झाले होते. मे २०१४ मध्ये या चौघांनी जिहारत पॅकेजच्या माध्यमातून इराकला जाण्याची योजना आखली. त्यासाठी त्यांनी २ लाख ३७ हजार ५०० रुपये खर्च केले. इराक भेटीदरम्यान आरोपी अब्दुल कादीर जिलानीच्या समाधीस्थळावर गेले होते. तिथे इराकमधील आपल्या ओळखीच्या माणसाच्या मदतीने त्यांनी अफगाणी नागरिक रेहमान दौलती आणि इराकी नागरिक अबू फातिमा यांची भेट घेतली. अबू फातिमाने त्यांना आयसीसच्या कॅम्पमध्ये प्रवेश मिळवून दिला. बगदादमध्ये असताना माजिदला एका कुवेतच्या नागरिकाकडून १ हजार डॉलरची देणगी दिली.

या देणगीच्या अनुषंगाने एनआयएने आरोपींवर दहशतवादी कृत्यांसाठी पैसा गोळा करण्याचा (टेरर फंडिंग) आरोप ठेवला आहे.

# एशियाटिक सोसायटी निवडणूक हायकोर्टाने निकाल राखून ठेवला

■ मुंबई

**मुंबईतील** ऐतिहासिक एशियाटिक सोसायटीच्या निवडणुकीसंदर्भातील महत्त्वाच्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने आपला निकाल राखून ठेवला आहे.

ऑक्टोबर २०२५ मध्ये निवडणूक जाहीर झाल्यानंतर सदस्य म्हणून सामावून घेतलेल्या १,४६४ व्यक्तींच्या वैधतेवर आता न्यायालय निर्णय देणार आहे. धर्मादाय आयुक्तांच्या हस्तक्षेपानंतर या प्रकरणाला कायदेशीर वळण लागले आहे. न्या. फरहान दुभाष यांच्या खंडपीठासमोर यावर सविस्तर सुनावणी पार पडली. या प्रकरणात वरिष्ठ पत्रकार आणि माजी राज्यसभा खासदार कुमार केतकर यांच्यासह अन्य सदस्यांनी धर्मादाय आयुक्तांच्या ११ मार्चच्या आदेशाला आव्हान दिले आहे. दरम्यान, मतदानाच्या पूर्वसंध्येलाच धर्मादाय आयुक्तांनी निवडणुकीला स्थगिती दिली होती.

